# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्या काँग्रेस नेते सज्जन कुमार यांचे तिहार तुरुंगात निधन

नवी दिल्ली दि.२० (वृत्तसंस्था)- काँग्रेसचे माजी खासदार आणि नेते सज्जन कुमार यांचे गुरुवारी वयाच्या ८०व्या वर्षी निधन झाले. एएनआय वृत्तसंस्थेनुसार, सज्जन कुमार यांना दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात मृतावस्थेत आणण्यात आले होते. १९८४ च्या शीखविरोधी दंगलीशी संबंधित तीनपैकी दोन प्रकरणांमध्ये दोषी ठरल्यानंतर ते तिहार तुरुंगात जन्मठेपेची शिक्षा भोगत होते. एका प्रकरणात त्यांची निर्दोष मुक्तता झाली होती.

दिल्ली कँटोन्मेंटमधील पालम कॉलनीत पाच शिखांच्या हत्येनंतर गुरुद्वारा जाळल्याच्या प्रकरणात सज्जन कुमार दोषी आढळले होते. दिल्ली उच्च न्यायालयाने १७ डिसेंबर २०१८ रोजी त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. सप्टेंबर २०२३ मध्ये, राऊस अॅव्हेन्यू न्यायालयाने दिल्लीतील सुलतानपुरी येथे तीन शिखांच्या हत्येच्या प्रकरणात त्यांची निर्दोष मुक्तता केली होती. दंगलीतील सीबीआयची एक प्रमुख साक्षीदार, चाम कौर यांनी आरोप केला होता की सज्जन जमावाला भडकवत होते. सरदार जसवंत सिंग आणि त्यांचा मुलगा तरुंदीप सिंग यांची १ नोव्हेंबर १९८४ रोजी सरस्वती विहार येथे हत्या करण्यात आली. दंगलखोरांनी त्यांच्यावर लोखंडी सळ्या आणि काठ्यांनी हल्ला केला. त्यानंतर त्यांनी त्या दोन शिखांना जिवंत जाळले. त्यांना १२ फेब्रुवारी २०२५ रोजी दोषी ठरवण्यात आले आणि २५ फेब्रुवारी रोजी जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली.


(वर्ष ६५ वे अंक २११) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शुक्रवार, दि.२१ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# पक्षांतराचे फायदे ते आजही उपभोगत आहेत; त्यांना थेट अपात्र ठरवा

## शिवसेना पक्ष-चिन्ह, अपात्रता खटला; देवदत्त कामत यांचा सुप्रीम कोर्टात जोरदार युक्तिवाद

नवी दिल्ली दि.२० (वृत्तसंस्था)- शिवसेना पक्ष-चिन्ह आणि आमदार अपात्रता प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयातील आजची सुनावणी संपली आहे. आजच्या सुनावणीत ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील देवदत्त कामत यांनी आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर अत्यंत आक्रमक आणि कायदेशीर दाखल्यांसह युक्तिवाद केला. कामत यांनी सर्वोच्च न्यायालयाला विनंती केली की, विधानसभा अध्यक्षांचा निर्णय चुकीचा ठरवत न्यायालयाने स्वतः एकनाथ शिंदे आणि त्यांच्या आमदारांना बंडखोरीच्या मूळ तारखेपासून अपात्र घोषित करावे. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती जे. व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर सलग ७ व्या दिवशी या प्रकरणाची सुनावणी पार पडली.

अॅड. कामत यांनी युक्तिवाद केला की, ''एखादा आमदार अपात्र ठरला की त्याचे सदस्यत्व संपुष्टात येते. या खटल्यात एका विशिष्ट वेळेत सुनावणी पूर्ण होऊ न शकल्यामुळे शिंदे गटाने या पक्षांतराचा फायदा उपभोगला आहे. एवढेच नाही तर, निवडणूक आयोगाने केवळ विधिमंडळ बहुमताच्या आधारावर त्यांना चिन्ह दिल्यामुळे आजही ते बंडखोरीचे आणि पक्षांतराचे फायदे उपभोगत आहेत.''

खंडपीठाने विचारले की, ''कशातून अपात्र ठरवावे?'' यावर कामत म्हणाले, ''ज्या दिवशी पक्षांतराचे कृत्य घडले, त्याच मूळ तारखेपासून त्यांचे सदस्यत्व संपुष्टात आल्याची कायदेशीर घोषणा सर्वोच्च न्यायालयाने करावी, एवढीच माझी मागणी आहे. आता कदाचित त्याचे परिणाम पूर्ववत अमलात आणणे शक्य नसले, तरीही ते केव्हा अपात्र ठरले होते, हे न्यायालय नक्कीच घोषित करू शकते.''

खंडपीठाने विचारले की, संबंधित पक्ष आणि अध्यक्षांना त्यांची बाजू मांडण्याची संधी द्यावी लागेल. यावर कामत यांनी सुभाष देसाई खटल्याची आठवण करून देत सांगितले, ''आम्ही त्यावेळीही हीच मागणी केली होती की सर्वोच्च न्यायालयाने स्वतः निर्णय घ्यावा, कारण अध्यक्षांवर आमचा विश्वास नव्हता. त्यांनी निकाल देण्यासाठी महिनोनमहिने लावले. आज सर्व पक्ष न्यायालयात उपस्थित आहेत. सर्वोच्च न्यायालय त्यांचा बचाव ऐकून घेऊन थेट निर्णय देऊ शकते.''

अपात्रतेचा निर्णय घेण्यात आधीच खूप वेळ वाया गेला आहे आणि आता विधानसभेचा कार्यकाळही संपत आला आहे. अशा परिस्थितीत हे प्रकरण फेरविचारासाठी पुन्हा विधानसभा अध्यक्षांकडे पाठवणे हे न्याय देणारे ठरणार नाही, असा युक्तिवाद कामत यांनी केला. ''न्याय देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार हे रिट याचिकांच्या तांत्रिक मर्यादेत अडकून राहू शकत नाहीत. न्यायालय स्वतः थेट आमदारांना अपात्र घोषित करू शकते,'' असे ते म्हणाले.

कामत यांनी ऐतिहासिक राजेंद्र सिंग राणा खटल्याचा संदर्भ दिला. त्या खटल्यातही अपवादात्मक परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाने बंडखोर आमदारांना उत्तर प्रदेश विधानसभेतून थेट आणि पूर्वलक्षी प्रभावाने अपात्र ठरवले होते.

कामत यांनी शेवटी थेट मागणी केली की, ''कथित बंडखोरीच्या जोरावर आज ते जे धनुष्यबाण चिन्ह उपभोगत आहेत, ते चिन्ह केवळ त्यांच्या तथाकथित विधिमंडळ बहुमतावर आधारलेले आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने आता अंतिम फैसला करावा की त्यांनी पक्षांतर केले होते की नाही. जर त्यांनी पक्षांतर केले असल्याचे न्यायालयाने मान्य केले, तर ज्या प्रमुख आधारावर निवडणूक आयोगाने त्यांना चिन्ह दिले, तो मूळ आधारच नष्ट होईल.''

या अत्यंत महत्त्वाच्या आणि सविस्तर युक्तिवादानंतर देवदत्त कामत यांनी अपात्रतेच्या मुद्द्यावरील आपला युक्तिवाद पूर्ण केला आहे. आता पुढील सुनावणीत एकनाथ शिंदे गटाकडून या सर्व आरोपांवर कसा बचाव केला जातो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जंतर मंतर आंदोलनात पोलिसी बळाचा वापर, आरोपांची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडून चौकशी समिती स्थापन

नवी दिल्ली दि.२० (वृत्तसंस्था)- जंतर मंतर येथे कॉकरोच जनता पक्षाच्या आंदोलकांवर झालेल्या बळाच्या वापराच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने पाच सदस्यीय उच्चाधिकार समितीची स्थापना केली आहे. या समितीचे अध्यक्षपद सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती आर. सुभाष रेड्डी भूषवतील. इतर सदस्यांमध्ये पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती रवी शंकर झा, दिल्ली उच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश न्यायमूर्ती शालिंदर कौर, सीबीआयचे माजी संचालक ऋषी कुमार शुक्ला आणि मेघालयाचे निवृत्त डीजीपी डॉ. एल. आर. बिश्नोई यांचा समावेश आहे. ही समिती पेलेट गन, इलेक्ट्रिक बॅटन, लाठीचार्ज आणि अश्रुधूर यांच्या अतिवापराची चौकशी करेल. तसेच महिला आंदोलकांवरील कथित हिंसाचार, पोलिसांची पाळत, जमाव नियंत्रण, जखमींवर उपचार आणि पीडितांना नुकसान भरपाई यासंबंधीच्या बाबींचीही तपासणी केली जाईल. ही समिती पोलीस, निमलष्करी दल आणि इतर सुरक्षा कर्मचाऱ्यांकडून आंदोलकांवर झालेल्या बळाच्या वापराच्या आरोपांची चौकशी करेल.

दरम्यान, दिल्ली पोलिसांनी १८ ऑगस्ट रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, २० जुलै रोजीचा संसद मोर्चा बेकायदेशीर होता आणि त्यासाठी कोणतीही परवानगी नव्हती. जंतर मंतर येथील आंदोलनात अनेक सराईत गुन्हेगारांनीही सहभाग घेतला होता. पोलिसांनी सांगितले की, संसद मोर्चादरम्यान आंदोलकांनी बॅरिकेड्स तोडले आणि पोलिसांवर हल्ला करून शांततापूर्ण आंदोलनात अडथळा आणला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी बळाचा वापर करण्यात आला, परंतु आंदोलकांवर कोणत्याही अतिरिक्त बळाचा वापर केला गेला नाही. पोलिसांच्या अत्याचारांची न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांना उत्तर म्हणून दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात पोलीस उपआयुक्त सचिन शर्मा यांनी ही माहिती दिली.

कॉकरोच जनता पार्टीचे (सीजेपी) जंतर मंतर येथील आंदोलन २० जून रोजी सुरू झाले. २० जुलैच्या संसद मोर्चादरम्यान पोलीस आणि आंदोलकांमध्ये संघर्ष झाला. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आंदोलकांनी दगडफेक केली, तर सीजेपीने पोलिसांवर लाठीचार्ज आणि अश्रुधुराचा वापर केल्याचा आरोप केला. या पोलीस कारवाईत मोठ्या संख्येने आंदोलक आणि सुरक्षा कर्मचारी जखमी झाल्याचे वृत्त आहे.

## तरुण तेजपालची सर्वोच्च न्यायालयात धाव, गोवा खंडपीठाने दिलेली शिक्षा रद्द करण्याची मागणी

नवी दिल्ली दि.२० (वृत्तसंस्था)- तेहलकाचे माजी संपादक तरुण तेजपाल यांनी आता आपली बलात्कार प्रकरणातून सुटका व्हावी यासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. बलात्कार प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने त्यांना दोषी ठरवलं आणि शिक्षाही सुनावली या निर्णयाला आव्हान देणारी याचिका तरुण तेजपाल यांनी दाखल केली आहे. तरुण तेजपालने ही याचिका दाखल करण्याच्या एक दिवस आधी गोवा सरकारनेही त्याच्या विरोधात याचिका दाखल केली आहे आणि बलात्कार प्रकरणात त्याला कठोर शिक्षा झाली पाहिजे असं म्हटलंय.

२०१३ मध्ये तरुण तेजपालने त्याच्या तेहलका या मासिकात काम करणाऱ्या सहकारी महिलेवर दोनवेळा बलात्कार केला होता. ७ आणि ८ नोव्हेंबर २०१३ ला ही घटना घडली होती. या प्रकरणात त्याला ३० नोव्हेंबर २०१३ ला अटक झाली.

त्यानंतर २०१४ मध्ये त्याला जामीन मिळाला. तर मुंबई सत्र न्यायालयाने २०२१ मध्ये या प्रकरणात त्याला पुराव्यांच्या अभावी निर्दोष सोडलं होतं. पण मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने हा निर्णय रद्द केला आणि तरुण तेजपालला दोषी ठरवलं. आता या प्रकरणात त्याला १० वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. याच निर्णयाला आव्हान देत तरुण तेजपालने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

## राज्यात सुटे खाद्यतेल विकण्यास बंदी, तुकाराम मुंढे यांचा विक्रेत्यांना इशारा

मुंबई दि.२० (प्रतिनिधी)- गेल्या काही दिवसांपासून अन्न व औषध प्रशासन विभागाच्यावतीने राज्यभरात भेसळखोरांच्या विरोधात धडक कारवाई करण्यात येत आहे. भेसळयुक्त खाद्यपदार्थांविरोधात तुकाराम मुंढे यांनी कारवायांचा धडाका लावला आहे. मुंढे यांच्या या धडाकेबाज कामाची सध्या राज्यात मोठी चर्चा सुरू आहे.

भेसळयुक्त पनीर, भेसळयुक्त दूध, रेस्टॉरंट्स, हॉटेलवरील निकृष्ट दर्जाचं जेवण, शाळांमधील खाणावळी यानंतर आता तुकाराम मुंढे यांनी आपला मोर्चा खाद्यतेलाकडे वळवला आहे. तुकाराम मुंढे यांनी आज (२० ऑगस्ट) पत्रकार परिषद घेत खाद्यतेल विक्रीबाबत महत्वाचे निर्देश जारी केले आहेत. यापुढे आता सुटे खाद्यतेल विकण्यास बंदी असणार आहे. तसेच खाद्यतेलाबाबत एफडीएच्या नियमांची यादी तुकाराम मुंढे यांनी सांगितली आहे.

'''सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' या अंतर्गत आपण काम करत आहोत, आता आपण काही कंप्लायंस ऑर्डर काढत आहोत. आधी आपण हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, मिल्क प्रोडक्टबाबत ऑर्डर काढली होती. राज्यातील शाळांच्या बाबतीत देखील कंप्लायंस ऑर्डर काढली होती. या सर्वांची अंमलबजावणी सुरू आहे. आता 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' या मोहिमेच्या पुढचा एक महत्वाचा टप्पा आहे. याबाबतीत पुढील कंप्लायंस ऑर्डर आपण आजपासून जारी करत आहोत. ही एडीबल ऑईलच्या (खाद्यतेल) संदर्भातील आहे'', अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली.

''खाद्यतेल हे सर्व नागरिकांच्या घरात असतं. हे खाद्यतेल आपल्याला वेगवेगळे पदार्थ बनवण्यासाठी लागतं. २०११ च्या कायद्यानुसार, लायसन्स असणं किंवा रजिस्टेशन्स असणं आणि फूड प्रॉडक्टच्या बाबतीत जे नियम आहेत ते पाळणं आणि त्यानुसार खाद्यतेलाच प्रोडक्शन होणं आणि विक्री करणं गरजेचं आहे'', असं तुकाराम मुंढे यांनी म्हटलं आहे.

''गेल्या काही काळात आम्ही काही तपासण्या केल्या असता आम्हाला काही गंभीर मुद्दे आढळून आले आहेत. त्यामुळे यामध्ये जास्त काम करण्याची गरज असल्याचं आमच्या निदर्शनास आलं. खाद्यतेलाची जी इंडस्ट्री आहे. त्यामध्ये पॅकेजिंग असेल किंवा लेबल किंवा ब्रँडवर काम करणाऱ्या आस्थापना. या सर्वांबाबत आमच्या ८ ते १० गोष्टी निदर्शनास आल्या आहेत आणि यामध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत'', असं तुकाराम मुंढे यांनी सांगितलं आहे.

''पहिली गोष्ट म्हणजे लायसन्स नसणारे अनेकजण आहेत. त्यांच्याकडे लायसन्स नाही, पण ते या क्षेत्रात काम करत आहेत. मात्र, यासाठी लायसन्स बंधनकारक आहे. ज्यांच्याकडे लायसन्स नसेल त्यांच्यावर कारवाई होईल'', असा इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला.

''दुसरं म्हणजे जे खाद्यतेल आहे, त्यामध्ये भेसळ केल्याचे प्रकार आम्हाला आढळून आलेत. मोहरी तेल जे आहे, त्याचंही अनधिकृत मिश्रण करण्याचे प्रकार आढळून आले आहेत. फक्त मोहरीचं तेल विकता येतं, पण मोहरीचं तेल मिश्रण करून विकता येत नाही'', अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी सांगितली.

## २८ तारखेपर्यंत ठोस निर्णय घ्या; मनोज जरांगे यांचा सरकारला अल्टीमेटम



वडीगोद्री दि.२० (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून राज्यातील वातावरण पुन्हा तापण्याची चिन्हे दिसत असून, मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला २९ ऑगस्टची अंतिम मुदत देत अंतरवाली सराटी येथे मोठे आंदोलन उभारण्याचा इशारा दिला आहे. मराठा समाजाला आतापर्यंत सरकारने केवळ आश्वासने आणि 'चॉकलेट' दिले; मात्र आरक्षणाच्या प्रश्नावर अद्याप ठोस निर्णय झालेला नाही, असा आरोप मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केला. अंतरवाली सराटी येथे गुरुवारी सायंकाळी माध्यमांशी बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, मराठा समाज आता आरक्षणाच्या प्रश्नावर शेवटच्या टप्प्यावर येऊन ठेपला आहे. गोरगरीब मराठा समाजासाठी आपण पुन्हा एकदा आंदोलन उभे करणार असून, हे आपले शेवटचे आंदोलन असेल, असा इशाराही त्यांनी दिला.

मराठा समाजाला देण्यात आलेल्या कुणबी प्रमाणपत्रांच्या मुद्द्यावरूनही जरांगे पाटील (पान ४ वर)

## गुजरातमध्ये बनावट दारूचे ६ बळी, २५ जणांची प्रकृती चिंताजनक

अहमदाबाद दि.२० (वृत्तसंस्था)- बनावट दारू पिल्यानंतर ६ जणांचा बळी गेल्याची धक्कादायक घटना गुजरातमध्ये घडली आहे. विशेष म्हणजे गुजरातमध्ये दारू बंदी आहे. मात्र, तरी देखील एका पार्टीत भेसळयुक्त दारू प्यायल्याने ६ जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे गुजरातमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेची पोलिसांकडून चौकशी सुरू करण्यात आली आहे.

गुजरातमधील भावनगर जिल्ह्यात रॉयल स्टॅगच्या बाटल्यांमध्ये भेसळयुक्त दारू भरली होती आणि या दारूचा समावेश एका पोलीस कर्मचाऱ्याने आयोजित केलेल्या पार्टीत करण्यात आला होता. पार्टी दरम्यान ही भेसळयुक्त दारू पिल्यानंतर अनेकांची प्रकृती अचानक बिघडली. यामध्येच ६ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच २५ जणांची प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. या संदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.

मंगळवारी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास भावनगरमधील एका हॉस्पिटलमध्ये २५ वर्षीय उपेंद्रसिंह यांचा मृत्यू झाल्यानंतर ही घटना उघडकीस आली आहे. उपेंद्रसिंह हे रविवारी रात्री त्यांचे मित्र हरपालसिंह गोहिल आणि विश्वराजसिंह गोहिल यांच्याबरोबर एका पार्टीत सहभागी झाले होते. ही पार्टी विश्वराजसिंह यांची पोलीस दलात निवड झाल्याचा आनंद साजरा करण्यासाठी आयोजित करण्यात आली होती.

याच पार्टीत काही (पान ४ वर)

## लुटारूंनी जहाजावरून लुटला तुर्कीच्या हत्यारांचा मोठा साठा

नवी दिल्ली दि.२० (वृत्तसंस्था)- तुर्कीच्या हत्यारांनी भरलेल्या एका जहाजाला समुद्री चाच्यांनी लुटल्याची धक्कादायक घटना सोमालियामधील पुंटलँडच्या किनाऱ्यावर घडली आहे. ज्या जहाजाला लुटण्यात आले त्या जहाजावरील क्रू मेंबरमध्ये सहा भारतीयांचाही समावेश होता.

या घटनेबाबत सोमालियाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, या आठवड्याच्या सुरुवातीला समुद्री चाच्यांनी कॅमेरूनचा झेंडा लावलेल्या एका कार्गो जहाजाचं अपहरण करण्यात आले. या जहाजावर तुर्कीची हत्यारे भरलेली होती. तसेच लुटारू या जहाजाला नुगालच्या किनाऱ्याच्या दिशेने घेऊन गेले.

एजन्सीने दिलेल्या माहितीनुसार एम/व्ही लुटुफ या जहाजाचं सोमवारी पुंटलँडच्या एइल जिल्ह्यातील मर्राया येथून सुमारे साडेतीन नॉटिकल मैल अंतरावरून अपहरण (पान ४ वर)

## दोन्ही शिवसेनेच्या वादात फायदा भाजपाचाच-प्रकाश आंबेडकर

अकोला दि.२० (प्रतिनिधी)- सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या दोन्ही शिवसेनेच्या लढाईत निर्णय कोणत्याही बाजूने लागला तरी फायदा भाजपाचा होणार आहे. धनुष्यबाण हे चिन्ह न्यायालयाकडून गोठवले जाणार असून शिवसेनेचे आमदार, खासदार त्यांच्याकडे टिकतील का? असा प्रश्न आहे. त्यांचे सर्व आमदार, खासदार भाजपामध्ये जातील, असे भाकीत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी आज येथे केले.

अकोल्यात पत्रकार परिषदेत ते बोलत होते. शिवसेना पक्ष आणि चिन्हावरून ठाकरे गट आणि शिंदे गटात वाद सुरू आहेत. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात सुनावणी निर्णायक टप्प्यावर आली. अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी शिवसेनेच्या लढ्यासह विविध मुद्द्यांवर भाष्य केले.

अॅड. प्रकाश आंबेडकर म्हणाले, ''सर्वोच्च न्यायालयात शिवसेना पक्षाच्या सुरू असलेल्या सुनावणीवरून असे दिसते की, आधी दक्षता न घेतल्यामुळे निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांना दिलेले 'धनुष्यबाण' या चिन्हांवर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केला.

आताची अवस्था पाहिली तर या लढाईत फायदा कोणाला? तर भाजपला याचा फायदा होईल. तो म्हणजे 'धनुष्यबाण' हे चिन्ह न्यायालयाकडून गोठवले जाईल. त्यामुळे दोन्ही शिवसेनेला एकमेकांच्या विरोधात लढावे लागेल. धनुष्यबाण हे चिन्ह नसल्यामुळे (पान ४ वर)

## सरकारने तातडीने सुप्रीम कोर्टात जावे; डॉ. नरेंद्र दाभोळकर प्रकरणी हर्षवर्धन सपकाळांनी सुनावले

पुणे दि.२० (प्रतिनिधी)- डॉ. नरेंद्र दाभोळकर यांना समाजापासून हिरावून घेणारे कोण होते? तर ज्यांना अविवेकी समाज निर्माण करायचा होता, ज्यांना स्त्री-पुरुष समानता मान्य नव्हती, ज्यांना अस्पृश्यता पुन्हा आपल्यावर लादायची होती, अशा विचारांच्या लोकांनी डॉक्टर नरेंद्र दाभोळकर यांच्यावर गोळ्या झाडल्या. डॉ.दाभोळकरांचं कोणाशीच संपत्ती, जमीनजुमल्या संदर्भात कुठलाही किंबहुना कुठलाही वैचारिकही वाद नव्हता. ते जे सांगत होते ते सर्वांना एक विचार म्हणून, एक समाज म्हणून मान्य होतं. मात्र प्रतिगामी म्हणून हा महाराष्ट्र या वाटेवरून जात असताना या पार्श्वभूमीवर त्यांचा झालेला खून हा वैज्ञानिक दृष्टिकोनाचा, संविधानाचा, विवेकाचा हा खून आहे, असं म्हटलं तर चुकीचं ठरणार नाही. अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली. मुळात सरकारमध्ये थोडी तरी लाज शिल्लक असेल तर सरकारने तातडीनं सुप्रीम कोर्टात जावं. अशी (पान ४ वर)

## मराठी न बोलण्याच्या हट्टावर सरकार कारवाई करणारच-छगन भुजबळ

नाशिक दि.२० (प्रतिनिधी)- राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी आज पत्रकार परिषद घेत विविध राजकीय आणि सामाजिक मुद्द्यांवर आपली स्पष्ट भूमिका मांडली. नाशिकच्या पालकमंत्रीपदी गिरीश महाजन यांच्या झालेल्या नियुक्तीचे त्यांनी स्वागत केले, तर इस्कॉन मंदिराच्या अध्यक्षांनी केलेल्या एका विधानावर त्यांनी आपल्या खास शैलीत सडेतोड उत्तर दिले.

गेल्या १९ महिन्यांपासून रखडलेल्या नाशिकच्या पालकमंत्रीपदाची धुरा अखेर गिरीश महाजन यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. यावर बोलताना भुजबळ म्हणाले की, ''गिरीश महाजन आधीपासूनच मंत्री होते, आता त्यांना पालकमंत्री पद दिल्याने ते आणखी चांगले काम करू शकतील. नाशिकमध्ये आगामी कुंभमेळा होणार आहे, त्यासाठी आमचे त्यांना पूर्ण सहकार्य असणार आहे. नाशिककरांच्या अडचणी सुटल्या पाहिजेत, हाच आमचा उद्देश आहे.''

गेले १९ महिने हे पद का अडकले होते? या प्रश्नावर स्पष्टीकरण देताना त्यांनी सांगितले की, ''आमच्याकडून याला कोणतीही हरकत नव्हती. हा निर्णय घेण्याचा सर्वस्वी अधिकार मुख्यमंत्र्यांचा आहे आणि त्यांनी तो घेतला आहे.''

इस्कॉन मंदिराच्या अध्यक्षांनी केलेल्या एका दाव्याबाबत विचारले असता, भुजबळांनी त्यांना चिमटा काढला. ''त्यांचे विधान त्यांना लखलाभ! मी सुद्धा भगवद्गीता पूर्ण वाचलेली नाही, तरीही मी अजूनही तुमच्यासमोर खंबीरपणे उभा आहे. असे काही नसते, मी केवळ जनतेच्या आशीर्वादाने इथे उभा आहे,'' असे उत्तर त्यांनी दिले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या एकत्रीकरणाच्या चर्चांवर पत्रकारांनी छेडले असता, भुजबळांनी मिश्किलपणे उत्तर दिले. ''आता तुम्हीच (पत्रकारांनी) यासाठी प्रयत्न करा,'' असे म्हणत त्यांनी या विषयावर अधिक बोलणे टाळले. तसेच, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनासंदर्भात विचारलेल्या प्रश्नावर त्यांनी केवळ हसून दाद दिली आणि कोणतेही भाष्य केले नाही.

## नरेंद्र मोदींचा पंतप्रधान म्हणून शेवटचा वाढदिवस-संजय राऊत

मुंबई दि.२० (प्रतिनिधी)- दिल्लीमध्ये काल (बुधवारी, ता१९) काँग्रेस पक्षाच्या मुख्यालयात काँग्रेस कार्यकारिणी समितीची बैठक पार पडली. या बैठकीत विविध मुद्द्यांवर आणि पक्षाच्या भविष्यातील रणनीतीबाबत चर्चा झाल्याची माहिती आहे. तर या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेण्याचा निर्णय झाल्याची माहिती असल्याचे वृत्त समोर आलं आहे. या बैठकीत लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मोठं विधान केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी ६ ते ८ महिन्यांत पंतप्रधानपदी राहणार नाहीत, असे राहुल गांधी यांनी बैठकीत म्हटल्याची माहिती आहे. यावरती आज पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावरती उत्तर देताना शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. राऊत म्हणाले, मग मी गेले काही दिवस झाले काय सांगतो आहे, (पान ४ वर)

# मुलांनो, विचार बदला : भविष्य बदलेल !

मुलांनो, आयुष्यात बदल घडवायचा असेल, तर नेहमी परिस्थिती बदलण्यापासून सुरुवात करायची गरज नसते. कधी कधी फक्त विचार बदलण्याची गरज असते. कारण तुमच्या हातात आज काय आहे यापेक्षा, त्या गोष्टींकडे तुम्ही कसं पाहता हे तुमचं उद्याचं आयुष्य ठरवतं.

एखादा विद्यार्थी म्हणतो, ङ्गमला गणित जमत नाही. दुसरा म्हणतो, गणित मला अजून जमत नाहीः पण मी शिकू शकतो. दोघांसमोर एकच विषय आहे, एकच पुस्तक आहे, एकच शिक्षक आहे; पण दोघांच्या मनातला विचार वेगळा आहे. पहिला विद्यार्थी स्वतःसाठी एक भिंत उभी करतो; दुसरा विद्यार्थी त्या भिंतीवर दररोज एक वीट काढण्याचा प्रयत्न करतो. फरक क्षमतेत नसतो; अनेकदा फरक असतो तो स्वतः बद्दलच्या विचारात.

मी करू शकत नाही हा विचार मनाला थांबवतो. मी प्रयत्न करेन हा विचार मनाला पुढे नेतो. ‘माझे मार्क्स कमी आहेत’ हा विचार निराश करू शकतो; पण ‘माझे मार्क्स कमी आहेत, म्हणून मला माझी पद्धत बदलायला हवी’ हा विचार मार्ग दाखवतो. परिस्थिती तीच असते, पण विचार बदलला की तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो.

तुमच्या मनात रोज हजारो विचार येतात. काही विचार तुम्हाला धैर्य देतात, काही भीती निर्माण करतात, काही तुम्हाला इतरांशी तुलना करायला लावतात. ‘तो माझ्यापेक्षा हुशार आहेः तिचे मार्क्स माझ्यापेक्षा जास्त आहेतः माझं काही होणार नाहीः, माझ्याकडे पुरेशा सुविधा नाहीतः माझं नशीबच खराब आहेः’ असे विचार सतत मनात फिरत राहिले तर तुमची ऊर्जा समस्या शोधण्यात खर्च होते. त्याच वेळी विचार बदलून पाहा –‘मी त्याच्याशी तुलना का करतोय? कालपेक्षा आज मी काय सुधारू शकतो? माझी कमतरता कुठे आहे? मला कोणती मदत घ्यायला हवी?’ अचानक लक्ष समस्येवरून उपायावर येतं. याचा अर्थ असा नाही की फक्त सकारात्मक विचार केला आणि सगळं आपोआप ठीक झालं. विचार हा सुरुवात आहे; त्यानंतर कृती हवी. ‘मला टॉपर व्हायचं आहे’ हा विचार छान आहे, पण त्याला रोजचा अभ्यास, योग्य पद्धत, सातत्य, शिस्त आणि वेळेचा योग्य वापर जोडला नाही तर ती फक्त इच्छा राहते. स्वप्न मोठं असू द्या, पण त्याच्यासाठी रोजची छोटी कृतीही तितकीच मोठी असावी.

अपयशाकडे पाहण्याचा विचारही बदला. परीक्षेत कमी गुण मिळाले तर ‘मी हुशार नाही’ असा निष्कर्ष काढू नका. स्वतःला विचारा –‘माझी चूक कुठे झाली?’ अभ्यास कमी झाला? पद्धत चुकीची होती? वेळेचं नियोजन जमलं नाही? लक्ष विचलित झालं? की विषय समजून घेण्याऐवजी फक्त पाठ केला? प्रश्न बदलला की उत्तरही बदलतं. अपयशाला स्वतःची ओळख बनवण्याऐवजी त्याला तुमचा शिक्षक बनवा.

तसंच, इतरांशी तुलना करण्याची सवयही सोडा. सोशल मीडियावर कोणाचं आयुष्य सुंदर दिसतं, कोणाचे गुण जास्त आहेत, कोणाला चांगलं कॉलेज मिळालं, कोण किती पुढे गेला – हे पाहत बसलात तर तुमचा स्वतःचा प्रवास तुम्हालाच कमी वाटू लागेल. लक्षात ठेवा, प्रत्येकाची सुरुवात वेगळी असते, प्रत्येकाचा वेग वेगळा असतो आणि प्रत्येकाचा प्रवास वेगळा असतो. तुमचं काम कोणाला मागे टाकणं नाही; तुमचं काम स्वतःला पुढे नेणं आहे.

तुमच्या विचारांमध्ये एक महत्त्वाचा बदल करा –‘मला हे का करावं लागतंय?’ या प्रश्नाबरोबर ‘यातून मला काय शिकता येईल?’ हा प्रश्नही विचारा. अभ्यास कंटाळवाणा वाटतो? त्यातून तुमची एकाग्रता वाढू शकते. कठीण विषय आहे? तो तुमची चिकाटी वाढवू शकतो. एखादं काम वारंवार चुकतंय? ते तुमच्या कमकुवत बाजूची जाणीव करून देऊ शकतं. प्रत्येक अडचणीतून काहीतरी शिकण्याची सवय लागली की अडचणी शत्रू राहत नाहीत; त्या तुमच्या विकासाचा भाग बनतात. आणि स्वतःशी बोलताना शब्द जपून वापरा. ‘मी आळशी आहे’ असं म्हणण्याऐवजी ‘माझ्या सवयी सुधारण्याची गरज आहे’ असं म्हणा. ‘मला काहीच जमत नाही’ ऐवजी ‘मला अजून शिकायचं आहे’ असं म्हणा. कारण तुम्ही स्वतःबद्दल जे वारंवार बोलता, तेच हळूहळू तुमच्या मनावर विश्वास बनून बसतं. स्वतःला खोटं कौतुक नको; पण स्वतःला सतत कमी लेखणंही नको.

मुलांनो, तुमचं भविष्य आज कुठेतरी दूर लिहिलेलं नाही. ते आजच्या विचारांत, आजच्या सवयींत आणि आजच्या निर्णयांत हळूहळू लिहिलं जात आहे. आज तुम्ही वेळेला महत्त्व देता का? आज तुम्ही शिकण्याची तयारी ठेवता का? चूक झाली तर ती स्वीकारता का? कठीण कामापासून पळता की त्याला सामोरं जाता? मन नाही म्हणत असतानाही योग्य गोष्ट करता का? या छोट्या प्रश्नांची उत्तरं तुमच्या भविष्यात मोठी भूमिका बजावतात.

म्हणून स्वतःला एक नवीन विचार द्या – ‘मी परिपूर्ण नाही, पण मी सुधारू शकतो.’ ‘मला सगळं येत नाही, पण मी शिकू शकतो.’ ‘आज मी मागे आहे, पण कायम मागे राहणार नाही.’ ‘माझ्या चुका माझं भविष्य ठरवत नाहीत; त्या माझी दिशा सुधारू शकतात.’ आणि मग त्या विचारांना कृतीची जोड द्या. कारण विचार बदलला की दृष्टिकोन बदलतो. दृष्टिकोन बदलला की कृती बदलते. कृती बदलली की सवयी बदलतात. सवयी बदलल्या की परिणाम बदलतातः आणि परिणाम बदलले की भविष्य बदलू लागतं. म्हणून मुलांनो, परिस्थितीला दोष देण्याआधी एकदा स्वतःच्या विचारांकडे पाहा. कदाचित तुमच्या आयुष्यात बदल घडवणारी पहिली पायरी बाहेर कुठेच नाहीः, ती तुमच्या मनातच आहे. मुलांनो, विचार बदलाः कारण भविष्य अचानक बदलत नाही; ते आधी मनात बदलतं, मग सवयींत दिसतं आणि शेवटी आयुष्यात उमटतं.

# शासकीय वसतीगृह प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज सुविधा

छत्रपती संभाजीनगर, दि. २० (प्रतिनिधी)– इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध असून अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे.

इयत्ता बारावीनंतर उच्च शिक्षणातील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या पात्र विद्यार्थ्यांनी दि.३१पर्यंत शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवर अर्ज सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक दयानंद कोकरे यांनी केले आहे.

शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी निश्चित करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार, दि. ७ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत. प्राप्त अर्जांची दि. १ ते ७ सप्टेंबर या कालावधीत छाननी करण्यात येईल. गुणवत्तेनुसार पहिली निवड यादी दि. ८ सप्टेंबर रोजी अंतिम करून प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या निवड यादीतील विद्यार्थ्यांना दि. १८ सप्टेंबरपर्यंत प्रवेश घेता येईल. पहिल्या निवड यादीनंतर रिक्त राहिलेल्या जागांसाठी प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांमधून गुणवत्तेनुसार दुसरी निवड यादी दि. २१ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. दुसऱ्या निवड यादीतील विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाची अंतिम मुदत दि. ३० सप्टेंबर राहणार आहे. तरी विमुक्त जाती व भटक्या जमाती (विजाभज), इतर मागासवर्ग (इमाव) व विशेष मागास प्रवर्ग (विमाप्र) या प्रवर्गातील योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांनी विहित मुदतीची वाट न पाहता शासनाच्या ‘ऑनलाइन वसतिगृह प्रवेश पोर्टल‘ http://hmasnew.mahit.org/ वर अर्ज सादर करावा, असे आवाहन सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, छत्रपती संभाजीनगर दयानंद कोकरे यांनी केले आहे.

# ज्येष्ठ नागरिकांचे हक्क : सन्मानाची खरी कसोटी

**२१ ऑगस्ट** रोजी ‘जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन’ साजरा केला जातो. ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनातील प्रश्न, त्यांच्या गरजा, समाजातील त्यांचे स्थान आणि त्यांच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने या दिवसाला विशेष महत्त्व आहे. हा दिवस केवळ ज्येष्ठांचा गौरव करण्याचा किंवा त्यांना शुभेच्छा देण्याचा दिवस नसून, वृद्धत्वाकडे समाज कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो, ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या मूलभूत अधिकारांचा प्रत्यक्ष लाभ मिळतो का आणि त्यांना सन्मानाने व स्वाभिमानाने जगण्यासाठी आवश्यक सामाजिक वातावरण उपलब्ध आहे का, याचा विचार करण्याची संधी आहे. आयुष्यभर कुटुंब, समाज आणि राष्ट्राच्या उभारणीत योगदान देणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना वृद्धावस्थेत सुरक्षितता, आरोग्य, आर्थिक आधार, कौटुंबिक आपुलकी आणि सामाजिक सन्मान मिळणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. ज्येष्ठ नागरिक हे समाजावरील ओझे नसून अनुभव, ज्ञान, संस्कार आणि सामाजिक स्मृतीची अमूल्य संपत्ती आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रश्नांकडे दयेच्या नव्हे, तर मानवी हक्क, सामाजिक न्याय आणि नागरिकांच्या प्रतिष्ठेच्या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे.

वृद्धत्व हा मानवी जीवनाचा स्वाभाविक टप्पा आहे. बालपण, तारुण्य, प्रौढत्व आणि वृद्धत्व या जीवनप्रवासातील नैसर्गिक अवस्था आहेत. वय वाढले म्हणून व्यक्तीची मानवी प्रतिष्ठा, नागरिकत्व किंवा मूलभूत अधिकार कमी होत नाहीत. शरीराची कार्यक्षमता काही प्रमाणात कमी होऊ शकते; परंतु जीवनानुभव, ज्ञान, कौशल्य, विवेक आणि सामाजिक भान यांचे मूल्य कमी होत नाही. उलट अनेक ज्येष्ठ नागरिकांकडे अनेक दशकांचा अनुभव असतो. कुटुंब, शेती, शिक्षण, उद्योग, प्रशासन, साहित्य, कला, सामाजिक कार्य आणि सार्वजनिक जीवन अशा विविध क्षेत्रांत त्यांनी दिलेले योगदान समाजाच्या जडणघडणीचा महत्त्वाचा भाग आहे. म्हणून वृद्धत्वाला दुर्बलतेचे प्रतीक मानण्याऐवजी अनुभव आणि ज्ञानाच्या समृद्धीचा टप्पा म्हणून स्वीकारणे गरजेचे आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये ज्येष्ठ व्यक्तींना आदर देण्याची दीर्घ परंपरा आहे. संयुक्त कुटुंबव्यवस्थेत आजी–आजोबा आणि कुटुंबातील इतर ज्येष्ठ व्यक्ती हे घरातील अनुभवाचे आणि संस्कारांचे केंद्र असत. मुलांच्या संगोपनात त्यांचा सहभाग असे. लोककथा, इतिहास, परंपरा, संस्कृती, जीवनमूल्ये, स्थानिक ज्ञान आणि कुटुंबाचा इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम ज्येष्ठ करत असत. मात्र बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे संयुक्त कुटुंबव्यवस्था कमी झाली. रोजगार आणि शिक्षणासाठी तरुणांचे स्थलांतर वाढले. शहरीकरण आणि व्यक्तिकेंद्रित जीवनशैलीमुळे कुटुंबातील परस्पर संवादाचे स्वरूप बदलले. परिणामी अनेक ज्येष्ठ नागरिक एकटे राहतात, तर काही जण कुटुंबासोबत असूनही भावनिक एकाकीपणाचा अनुभव घेतात. या बदलत्या परिस्थितीत ज्येष्ठांच्या हक्कांचे संरक्षण अधिक महत्त्वाचे ठरते.

ज्येष्ठ नागरिकांचा सर्वांत मूलभूत अधिकार म्हणजे सन्मानाने जगण्याचा अधिकार होय. वय वाढले म्हणून एखाद्या व्यक्तीचे मत, अनुभव किंवा निर्णयक्षमता संपत नाही. घरातील निर्णयांमध्ये ज्येष्ठांचा सहभाग असणे, त्यांच्या मतांचा आदर करणे आणि त्यांच्या भावना समजून घेणे आवश्यक आहे. आर्थिकदृष्ट्या कुटुंबावर अवलंबून असलेल्या ज्येष्ठ व्यक्तीलाही स्वतःचा स्वाभिमान असतो. तिच्या प्रत्येक गरजेकडे उपकार म्हणून पाहणे चुकीचे आहे. ‘आता तुमचे वय झाले आहे’, ‘तुम्हाला काही समजत नाही’ किंवा ‘तुम्ही आमच्यावर अवलंबून आहात’ अशा मानसिकतेतून ज्येष्ठांना कमी लेखणे त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर आघात करणारे आहे. ज्येष्ठांची सेवा ही उपकाराची नव्हे, तर कृतज्ञतेची आणि सामाजिक जबाबदारीची भावना असली पाहिजे.

ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांमध्ये सुरक्षिततेचा अधिकार अत्यंत महत्त्वाचा आहे. वृद्ध व्यक्तींना शारीरिक हिंसा, मानसिक छळ, दुर्लक्ष, आर्थिक शोषण, फसवणूक आणि मालमत्तेवर बेकायदेशीर दबाव यांपासून संरक्षण मिळाले पाहिजे. ज्येष्ठ नागरिकांवरील अत्याचार अनेकदा घराच्या चार भिंतींच्या आत घडतात. कौटुंबिक प्रतिष्ठा, नातेसंबंध आणि समाजाच्या प्रतिक्रियेच्या भीतीमुळे अनेक ज्येष्ठ नागरिक तक्रार करण्यास टाळाटाळ करतात. काही वेळा अत्याचार करणारी व्यक्तीच त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करणारी असल्यामुळे ज्येष्ठांना विरोध करणे कठीण जाते. त्यामुळे त्यांना विश्वासार्ह तक्रार निवारण व्यवस्था, कायदेशीर मार्गदर्शन आणि सामाजिक आधार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ज्येष्ठ नागरिकांनी अन्याय सहन करणे ही संस्कृती बदलली पाहिजे.

भारतामध्ये पालक आणि ज्येष्ठ नागरिकांच्या देखभालीसाठी कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत. ‘पालक आणि ज्येष्ठ नागरिकांचे भरणपोषण व कल्याण अधिनियम, २००७’ हा या संदर्भातील महत्त्वाचा कायदा आहे. ज्येष्ठ नागरिकांना भरणपोषण आणि आवश्यक आधार मिळावा, त्यांची उपेक्षा होऊ नये आणि त्यांच्या कल्याणासाठी संस्थात्मक व्यवस्था उपलब्ध व्हावी, हा या कायद्याचा प्रमुख उद्देश आहे. मात्र कायदा असणे आणि तो गरजू नागरिकांपर्यंत पोहोचणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. ग्रामीण भागातील, अशिक्षित किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची माहिती अनेकदा नसते. त्यामुळे कायदेशीर साक्षरता वाढविणे आणि तक्रार निवारणाची प्रक्रिया सुलभ करणे आवश्यक आहे. हक्कांची माहिती असणे हीच हक्कांच्या संरक्षणाची पहिली पायरी आहे.

आर्थिक सुरक्षितता हा ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांचा महत्त्वाचा आधार आहे. संघटित क्षेत्रातील काही व्यक्तींना निवृत्तीनंतर निवृत्तीवेतन किंवा इतर आर्थिक साधनांचा आधार मिळतो; परंतु असंघटित क्षेत्रातील अनेक कामगार वृद्धावस्थेत नियमित उत्पन्नाविना राहतात. शेतमजूर, लघु शेतकरी, घरगुती कामगार, कारागीर, छोटे व्यावसायिक आणि इतर असंघटित कामगारांनी आयुष्यभर कष्ट केलेले असतात; परंतु वृद्धापकाळासाठी पुरेशी आर्थिक तरतूद झालेली असेलच असे नाही. महागाई, औषधोपचाराचा खर्च आणि दैनंदिन गरजा यामुळे त्यांची आर्थिक असुरक्षितता वाढते. म्हणून वृद्धापकाळातील सामाजिक सुरक्षा, निवृत्तीवेतन, आरोग्यसुरक्षा आणि विविध कल्याणकारी योजनांचा लाभ पात्र ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने पोहोचणे आवश्यक आहे.

आरोग्याचा अधिकार हा ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनमानाशी थेट जोडलेला आहे. वाढत्या वयाबरोबर नियमित आरोग्य तपासणी, औषधोपचार, तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला, आपत्कालीन उपचार आणि पुनर्वसनाच्या सुविधांची आवश्यकता वाढते. ग्रामीण भागातील ज्येष्ठांना आरोग्यसेवा मिळिवण्यासाठी लांब अंतर पार करावे लागणे, वाहतुकीचा अभाव किंवा उपचाराचा खर्च परवडत नसणे अशा अडचणी येऊ शकतात. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि जिल्हास्तरीय आरोग्यसेवा यंत्रणेत ज्येष्ठ नागरिकांच्या गरजांचा विशेष विचार केला पाहिजे. आरोग्यसेवा ही दया नसून सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक असलेली मूलभूत गरज आहे. ज्येष्ठ नागरिकांना उपचार घेताना सन्मानजनक वर्तन आणि योग्य माहिती मिळणेही तितकेच आवश्यक आहे.

शारीरिक आरोग्याबरोबर मानसिक आरोग्यालाही समान महत्त्व दिले पाहिजे. निवृत्तीनंतर दैनंदिन जीवनातील भूमिका बदलतात. मुलांचे स्थलांतर, जोडीदाराचे निधन, मित्रपरिवार कमी होणे, सामाजिक सहभाग घटणे आणि एकाकीपणा यामुळे मानसिक ताण वाढू शकतो. काही ज्येष्ठ नागरिकांना आपले जीवन निरर्थक झाल्याची भावना निर्माण होऊ शकते. अशा वेळी कुटुंबीयांनी त्यांच्याशी संवाद साधणे, त्यांच्या भावना ऐकून घेणे, त्यांना घरातील निर्णयांमध्ये सहभागी करणे आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. मानसिक आरोग्याचा अधिकार म्हणजे उपचार मिळण्यापुरता मर्यादित नसून प्रेम, आपलेपणा, भावनिक आधार आणि सन्मानाचे वातावरण मिळण्याचा अधिकारही आहे.

मालमत्ता आणि संपत्तीशी संबंधित हक्क हा ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनातील अत्यंत संवेदनशील विषय आहे. आयुष्यभराच्या कष्टातून मिळिवलेले घर, जमीन, बचत किंवा इतर संपत्ती ही वृद्धावस्थेतील सुरक्षिततेचा आधार असते. काही वेळा भावनिक दबाव, फसवणूक किंवा चुकीची माहिती देऊन ज्येष्ठांकडून मालमत्ता हस्तांतरित करून घेतली जाते. त्यानंतर त्यांची उपेक्षा किंवा छळ केला जातो. त्यामुळे मालमत्तेशी संबंधित निर्णय घेताना ज्येष्ठांना स्वतंत्रपणे विचार करण्याची संधी आणि आवश्यक कायदेशीर माहिती मिळणे गरजेचे आहे. ज्येष्ठांच्या मालमत्तेवर हक्क मिळिवण्यापेक्षा त्यांच्या सन्मानाचा आणि सुरक्षिततेचा विचार महत्त्वाचा आहे. मालमत्तेच्या प्रश्नावरून ज्येष्ठ व्यक्तीला घरातच असुरक्षित वाटू लागणे ही अत्यंत गंभीर सामाजिक विसंगती आहे.

ज्येष्ठ महिलांच्या हक्कांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. आयुष्यभर घर आणि कुटुंबाची जबाबदारी पार पाडलेल्या अनेक महिलांकडे स्वतःच्या नावावर पुरेशी आर्थिक साधने नसतात. पतीच्या निधनानंतर त्यांची आर्थिक आणि सामाजिक असुरक्षितता वाढू शकते. ग्रामीण भागातील वृद्ध महिलांना आरोग्यसेवा, सामाजिक सुरक्षा, निवास, आर्थिक सहाय्य आणि कायदेशीर माहिती मिळिवताना अधिक अडचणी येऊ शकतात. त्यामुळे ज्येष्ठ महिलांना त्यांच्या मालमत्ता हक्कांची, आर्थिक योजनांची, आरोग्यविषयक सुविधांची आणि कायदेशीर संरक्षणाची माहिती देणे आवश्यक आहे. वृद्ध महिला ही केवळ कुटुंबाची सेवा करणारी व्यक्ती नसून स्वतंत्र अधिकार असलेली नागरिक आहे, ही जाणीव समाजात दृढ झाली पाहिजे.

आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात डिजिटल समावेश हाही ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांचा महत्त्वाचा भाग बनला आहे. बँकिंग, आरोग्यसेवा, तिकीट आरक्षण, शासकीय सेवा आणि विविध आर्थिक व्यवहार मोठ्या प्रमाणावर डिजिटल झाले आहेत. डिजिटल साधनांचा वापर न समजल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना इतरांवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे त्यांना भ्रमणध्वनी, डिजिटल बँकिंग आणि शासकीय संकेतस्थळांचा सुरक्षित वापर शिकविणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सायबर फसवणूक, बनावट दूरध्वनी, खोटे संदेश, फसवे गुंतवणूक प्रस्ताव आणि आर्थिक गैरव्यवहार यांपासून सावध राहण्याचे प्रशिक्षण देणेही गरजेचे आहे. डिजिटल साक्षरता ही ज्येष्ठांच्या स्वावलंबनाची नवी गुरुकिल्ली ठरू शकते.

ज्येष्ठ नागरिकांना सामाजिक सहभागाचा अधिकार मिळणेही आवश्यक आहे. वृद्धत्व म्हणजे समाजातून निवृत्ती नव्हे. अनेक ज्येष्ठ नागरिकांकडे समाजासाठी देण्यासारखे ज्ञान, कौशल्य आणि अनुभव असतो. निवृत्त शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करू शकतात. अनुभवी शेतकरी पारंपरिक कृषिज्ञान पुढील पिढीला देऊ शकतात. कारागीर कौशल्याचे प्रशिक्षण देऊ शकतात. विविध क्षेत्रांत काम केलेले ज्येष्ठ तरुणांना व्यावसायिक आणि जीवनविषयक मार्गदर्शन देऊ शकतात. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी ज्येष्ठांच्या अनुभवाचा समाजहितासाठी उपयोग करून घेण्यासाठी संधी निर्माण केल्या पाहिजेत. ज्येष्ठांचा अनुभव आणि तरुणांची ऊर्जा यांचा संगम सामाजिक विकासासाठी अत्यंत परिणामकारक ठरू शकतो.

ज्येष्ठ नागरिकांना सार्वजनिक जीवनातही सुलभ आणि सुरक्षित वातावरण मिळणे आवश्यक आहे. सार्वजनिक वाहतूक, शासकीय कार्यालये, बँका, रुग्णालये आणि इतर सार्वजनिक ठिकाणी बसण्याची सुविधा, सुलभ प्रवेश, आवश्यक मार्गदर्शन आणि सुरक्षित हालचालीची व्यवस्था असावी. उद्याने, वाचनालये, विरंगुळा केंद्रे आणि सामाजिक संवादासाठी सार्वजनिक जागा उपलब्ध असणे त्यांच्या मानसिक आणि सामाजिक आरोग्यासाठी उपयुक्त आहे. गावांच्या आणि शहरांच्या विकासाचे नियोजन करताना ज्येष्ठ नागरिकांच्या गरजांचा विचार करणे म्हणजे सर्वसमावेशक समाजाच्या निर्मितीकडे टाकलेले महत्त्वाचे पाऊल होय.

ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारी केवळ शासनाची नाही. कुटुंब, समाज, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संघटना, माध्यमे आणि स्थानिक स्वराज्य संस्था या सर्वांची भूमिका महत्त्वाची आहे. कुटुंबाने प्रेम, आपुलकी आणि सुरक्षितता द्यावी. समाजाने ज्येष्ठांना सक्रिय सहभागाच्या संधी द्याव्यात. शासनाने कायदे आणि कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवाव्यात. स्वयंसेवी संस्थांनी हक्कांविषयी कायदेशीर आणि सामाजिक जनजागृती करावी. माध्यमांनी ज्येष्ठांच्या समस्यांकडे केवळ भावनिक दृष्टिकोनातून न पाहता अधिकार आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून पाहावे. ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांवर सार्वजनिक चर्चा वाढली तर त्यांच्या समस्यांकडे धोरणात्मक पातळीवर अधिक गांभीर्याने पाहिले जाईल.

ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांचा प्रश्न हा केवळ आजच्या वृद्ध पिढीचा प्रश्न नाही. आजचे तरुण उद्याचे ज्येष्ठ नागरिक आहेत. आपण आज ज्येष्ठांशी ज्या पद्धतीने वागतो, त्याच समाजात उद्या आपल्यालाही वृद्धत्वाचा अनुभव घ्यावा लागणार आहे. त्यामुळे ज्येष्ठांच्या हक्कांचे संरक्षण करणे म्हणजे आपल्या भविष्यातील समाजाचे संरक्षण करणे होय. वृद्धत्वाला दुर्बलता, एकाकीपणा आणि परावलंबित्वाशी जोडण्याऐवजी अनुभव, ज्ञान, सन्मान आणि सामाजिक योगदानाशी जोडले पाहिजे. ज्येष्ठ नागरिकांना समाजाच्या काठावर ठेवण्याऐवजी विकासाच्या मुख्य प्रवाहात स्थान देणे ही लोकशाही आणि समताधिष्ठित समाजाची गरज आहे.

२१ ऑगस्टचा जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन हा केवळ ज्येष्ठांना शुभेच्छा देण्याचा किंवा त्यांचा सत्कार करण्याचा दिवस न राहता त्यांच्या हक्कांविषयी आत्मपरीक्षण करण्याचा दिवस ठरला पाहिजे. ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाने जगण्याचा, सुरक्षित राहण्याचा, आरोग्यसेवा मिळिवण्याचा, आर्थिक आधाराचा, मालमत्तेचे संरक्षण करण्याचा, सामाजिक जीवनात सहभागी होण्याचा, निर्णयप्रक्रियेत आपले मत मांडण्याचा आणि प्रेम व आपुलकी मिळिवण्याचा अधिकार आहे. त्यांना दयेची नव्हे, तर सन्मानाची गरज आहे; उपकारांची नव्हे, तर अधिकारांच्या हमीची गरज आहे. त्यांच्या हक्कांचे संरक्षण ही केवळ कायदेशीर जबाबदारी नसून सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि लोकशाही मूल्यांची खरी कसोटी आहे. ज्येष्ठांच्या अनुभवाला योग्य स्थान, त्यांच्या जीवनाला सुरक्षितता आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला स्वाभिमान मिळाला, तरच समाज खऱ्या अर्थाने प्रगत आणि सुसंस्कृत म्हणता येईल. म्हणूनच ‘ज्येष्ठ नागरिकांचे हक्क’ हा एका दिवसापुरता विषय न राहता प्रत्येक कुटुंबाच्या संस्कारांचा, प्रत्येक संस्थेच्या सामाजिक बांधिलकीचा आणि प्रत्येक नागरिकाच्या मानवी कर्तव्याचा अविभाज्य भाग झाला पाहिजे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# शिळ्या पाण्याची गोष्ट; थेंब वाचवला.. थेंब जमवला..

**पैसा** वाचवला म्हणजेच पैसा कमावला अशा आशयाची एक इंग्रजी म्हण आहे. ती सर्वच बाबतीत तंतोतंत जुळते मग ती बचत पैशांचीच असायला पाहिजे असे नाही तर तरी ऊर्जा बचत, इंधन बचत आणि पाण्याबाबतही लागू होते.

आपण जलसंधारणाचा विचार करतो त्यावेळी केवळ पाणी अडविणे आणि पाणी जिरवणे इतकाच मर्यादीत ठेवता कामा नये. पाणी अडविण्यासाठी बांध–बांधणे, धरणे आणि तलाव निर्मिती करणे, पाणलोट क्षेत्र तयार करून पाणी जमिनीत मुरवणे हे सामान्य व्यक्तीचे काम असत नाही. त्यासाठी यंत्रणा, जनसहभाग, यंत्रसामुग्री आदींचा वापर करावा लागतो.

प्रामाणिक पर्यावरणप्रेमी नागरिक या भूमिकेतून आपण ज्यावेळी बघतो त्यावेळी आपल्याला नेमकेपणाने बचत कशी करणे शक्य आहे याची माहिती करून घेणे आवश्यक आहे. ही माहिती जाणून घेतल्यानंतर आपण कशा प्रकारे यात सहभाग देवू शकतो याचा आपल्याला अंदाज येईल आणि ती कृतीत उतरविणे शक्य होईल.

थेंबे थेंबे तळे साचे अशी मराठीत एक म्हण आहे. याचा दुसरा अर्थ पाण्याच्या प्रत्येक थेंबाच मोल जाणून घेऊन त्या प्रत्येकाची बचत म्हणजे आपण कमावलेले पाणी होय.

माझं शेत माझं पाणी म्हणत शेती करताना त्याला लागणाऱ्या आवश्यक पाण्याचीही शेती करण्याची संकल्पना राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलयुक्त शिवारच्या माध्यमातून समोर आणली आणि त्याला उत्सफूर्त जनप्रतिसाद मिळाला व यातून राज्यात ज्या जिल्ह्यात वर्षातून केवळ एकाच हंगामात




शेती शक्य होती त्या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी दोन हंगाम तर काही ठिकाणी बारमाही ३ हंगाम शेती शक्य झाल्याचे चित्र मराठवाडा आणि विदर्भाच्या काही पर्जन्यछाया (अवर्षण प्रवण) असलेल्या जिल्ह्यात बघायला मिळाला.

आता जलसंधारण विभाग आणि कृषी विभागाच्या माध्यमातून जलयुक्त शिवार २.० ची प्रगती याच दिशेने होत आहे. पाऊस एकाच हंगामात पडत असला तरी शेतातील काही भागात शेततळी तयार करून पाणी साठवून दुसऱ्या हंगामात देखील शेती करता येते. काही ठिकाणी तर या शेततळ्यांसाठी असलेल्या जागेतून शेतकरी मत्स्यव्यवसाय देखील करू लागले आणि त्यांच्या शेतीतील उत्पन्नात वाढ आणि अधिक नफा देखील मिळायला लागला.

आपण नागरिक म्हणून काम करू शकतो याचा जर विचार केला तर छतावर पडणारं पाणी जमिनीखाली टाक्यांमध्ये साठवण्याचा एक पर्याय आहे. दुसरा उत्तम पर्याय म्हणजे छतावर पडणारं हे पाणी विहिरी आणि विंधन विहिरी (बोअर) च्या माध्यमातून भूजलात सोडणे हा आहे. यामुळे जमिनीखालील पातळी अर्थात भूजलस्तर झपाट्याने वाढतो हे सिद्ध झाले आहे.

पाण्याचे मोल जाणणे म्हणजे त्यासाठीची प्रक्रिया आपण समजून घ्यावी. आपल्याकडे जे घरात नळाद्वारे पेयजल येते ते शुद्धीकरण संयंत्रात प्रक्रिया करून घरापर्यंत आणले जाते. यात शुद्धीकरण आणि पाईप लाईन्स, पाण्याच्या टाक्या यांचा खर्च असतो. हे प्रक्रिया केलेले शुद्ध पेयजल आपण किती गांभीर्याने वापरतो हे आपण बघावे.

घराबाहेर, प्रवासात आपण हेच पेयजल २० रूपये लिटरने घेतो म्हणजे घरात नळाद्वारे येणाऱ्या पाण्यालाही मोल आहे ते देखील आर्थिक रूपात आहे हे ध्यानात ठेवणे गरजेचे आहे.

सामान्य नागरिक म्हणून पाण्याची बचत करण्याचे छोटे आणि सोपे उपाय सर्वांनी केले पाहिजे. प्रक्रिया करून घरात आलेले शुद्ध पेयजल आपण सकाळी दात घासताना, हात धुताना आणि अनेकदा दाढी करताना वाया घालत असतो. नळाची तोटी पूर्णवेळ खुली ठेवून ते शुद्ध पाणी आपण सांडपाण्यात मिसळतोय याची जाणीव ठेवून पाण्याचा माफक वापर करावा.

घरात पाण्याने अंघोळ करताना शॉवर ऐवजी बादलीचा वापर करणे, घरातील गळके नळ आणि तोटी यांची वेळीच दुरूस्ती करून देखील आपण पाण्याचा वापर मर्यादीत ठेवू शकतो. अनेक जण दुचाकी आणि चार चाकी वाहनाला अक्षरश: अंघोळ घालत वाहन साफ करतात. जे पाणी शुद्ध पेयजल आहे त्याला सांडपाण्यात टाकणे प्रत्येकाने थांबवले पाहिजे.

पाण्याच्या बाबतीत असलेली आणखी एक चुकीची संकल्पना म्हणजे शिळं पाणीः घरात एकदा पाणी आपण भांड्यांमध्ये भरून ठेवलं आणि दुसऱ्या दिवशी नळाला पाणी आलं आहे अशा स्थितीत हे पाणी शिळं झालं म्हणत भांड्यामधील पाणी फेकून देत आपण नव्याने भांडी भरून घेणं हा उपक्रम वर्षानुवर्षे करत आलो आहोत. पाणी कधीही शिळं होत नाही. पाण्याचा केमिकल फॉर्म्यूला क२ज इतका साधा आहे ते कधी खराब होत नाही किंवा त्याची चव देखील बदलत नाही. आपण हे लक्षात घेतलं पाहिजे की, पाण्याचा सूर्यप्रकाशाशी संपर्क होत नाही तोवर त्यात कोणताही बदल होत नाही. बाटलीबंद पाणी आपण वापरतो त्यावर एुक्ष्िीू ऊींश असते ते पाणी ज्या प्लास्टिकच्या बाटलीत बंद आहे त्या प्लास्टिकची असते. प्लास्टिकमुळे अशी तारीख टाकण्यात येते. मात्र वर्षानुवर्षे अव्याहत निसर्गत: येणारं पाणी शुद्ध स्थितीत कधीही शिळं होत नाही. आपण पाणी जाणून घेऊ आणि त्याचा योग्य वापर करून पर्यावरण जपूयाः चला विचार बदलूया जबाबदार होऊयाः

**– प्रशांत दैठणकर**

# महानगरपालिकेत सद्भावना दिनाची शपथ



छत्रपती संभाजीनगर, दि. २० (प्रतिनिधी) – सद्भावना दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज सद्भावना दिनाची शपथ घेऊन हा दिवस साजरा करण्यात आला.

यावेळी महापौर समीर राजूरकर यांनी उपस्थितांना सद्भावना दिनाची शपथ दिली. देशाची एकता, अखंडता आणि सामाजिक सलोखा कायम राखण्यासाठी तसेच सर्व नागरिकांमध्ये बंधुभाव, समानता आणि परस्पर आदराची भावना वृद्धिंगत करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

कार्यक्रमास स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, सभागृह नेते गोविंद केंद्रे, मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्यासह महानगरपालिकेतील सर्व विभागप्रमुख तसेच इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.


# सुजलाम: सुफलाम: भारतासाठी जलसंधारण:!

**पाणी** अर्थात जल आणि आपल्या जगण्यासाठी अत्यावश्यक असणारा एक घटक म्हणून याला जीवन देखील आपण म्हणतो. प्रत्येकासाठी पाणी आवश्यक आहे. आपण सर्वच जगात विकसित संस्कृतीचा अभ्यास केल्यास आपणांस जाणवतं की, वनांमधून आणि टोळ्यांमधून जगणारा मानव प्राणी ज्यावेळी सामाजिक व्यवस्था उभारणीसह शेती व्यवसायाला लागला, त्यावेळी सर्वांचा अधिवास नद्या आणि पाण्यांचे साठे आणि पाण्यावरच अवलंबून आहे.

मानवी जीवनात पाणी हे प्राण व्यवस्था आहे. तसेच विकासाचा भाग म्हणून आपण इतर क्षेत्रांकडे बघतो. त्यावेळी कृषी सह उद्योग व्यवसासाठी देखील पाण्याचे तितकेच महत्त्व राहिलेले आहे. औद्योगिक क्रांती झाल्यानंतर नव्या उद्योगांमध्ये पाण्याचा वापर अधिक वाढत गेला.

आज विचार करायचा तर पाण्याबाबत प्रथम आकडेवारी बघायला हवी. जगात असणाऱ्या समुद्रांमधील पाणीसाठा एकूण पाणीसाठ्याच्या ९७% इतका आहे आणि हे पाणी क्षार युक्त आहे. अर्थात पिण्यायोग्य पाणी नाही. जे ३ टक्के पाणी पिण्यायोग्य म्हणता येईल, अशा स्थितीत आहे. त्यातील ६८ ते ७० टक्के पाणी ग्लेशियर अर्थात हिमनग आणि हिमनद्यांच्या स्वरूपात आहे. तर त्यानंतर शिल्लक राहणाऱ्या शुद्ध जलापैकी ३० टक्के पाणी हे भूजल (जमिनीखालील स्तरात) आहे. उर्वरित पाणी पावसाद्वारे जमिनीवर येते आणि नद्या, सरोवरे आणि भूतलावर येते. यात पावसाने पडणारे पाणी नद्यांमध्ये आले तरी त्यावर प्रक्रिया केल्याशिवाय ते जल उपलब्ध होत नाही, ही परिस्थिती आहे.

पृथ्वीची एकूण लोकसंख्या विभिन्न खंडांमध्ये विस्तारलेले आहे. त्या प्रत्येक ठिकाणी पावसाचे प्रमाण वेगवेगळे आहे. अशा स्थिती सोबत पाण्याची वाढती




मागणी आणि उपलब्ध पाणी यांचा समतोल बिघडत असल्याचे आपणास दिसते आणि त्यावर उपाय अर्थात पाणी साठवणे आणि त्याचा योग्य पद्धतीने वापर करणे हाच आहे. आपला भारत देश त्यातही मौसमी हवामान प्रदेशात आहे, त्यामुळे देशात चार महिन्यात पडणाऱ्या पावसावर १२ महिन्यांचे नियोजन करावे लागते. आपला देश मुख्यत्वेकरून कृषी प्रधान देश आहे आणि हे शेतीचे काम पाण्यावर आधारित असे आहे. पडणारा पाऊस कुठे आणि किती पडेल, याचा अंदाज वर्तवण्याचे तंत्र अवगत झाले असले तरी आपण लहरी अशा निसर्गावर निर्भर आहोत. यामुळे देशात पडणाऱ्या प्रत्येक पाण्याच्या/पावसाच्या थेंबाला आपण वापरणे हा सर्वोत्तम मार्ग आहे.

पाणी अडवणे जमिनीत जिरवून त्याचे साठे निर्माण करणे, तलावांच्या माध्यमातून अधिकाधिक पाणी साठवणे आदी पद्धतीने आपण पाण्याचा अधिक सुयोग्य वापर करू शकतो. शेतीला लागणाऱ्या पाण्याची व्यवस्था शेतीतच असायला हवी. काही दशकांपूर्वी यांत्रिक क्षमता नव्हती, त्यावेळी शेतीत विहीर खोदून त्यातील भूजलावर शेती आपल्या देशात होत होती. परंतु यांत्रिकीकरण झाले आणि आम्ही भूजल साठा गतिमान पद्धतीने उपसा करायला लागलो आणि भूजल पातळीत झपाट्याने घट होत गेली. नद्यांचे पाणी अडवून धरणे बांधणे पाटांच्या मदतीने शेतीस सिंचन व्यवस्था तयार करण्याचे धोरण स्वीकारण्यात आले. मात्र ही प्रक्रिया वेळखाऊ आणि खर्चिक अशीच आहे. एका बाजूला आपण धरणं बांधत असतांना, दुसऱ्या बाजूने औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यात देखील झपाट्याने वाढ झाली. या सर्वात पिण्याच्या पाण्यास प्राधान्य असल्याने आधी पेयजल नंतर उद्योग आणि मग कृषी सिंचन या क्रमाने वापर करण्याची वेळ आल्याने धरणं भरली तरी इतर सुविधांच्या आभावी पाण्याचे संकट वाढत आहे. यासाठी आता जलसंधारणाचे महत्त्व देखील तितकेच वाढलेले आहे. जलसंधारण क्षेत्रात राज्यात मोठ्या प्रमाणात कामे सुरू आहेत. मात्र याला अधिक बळकटी देण्याची गरज आहे. जलसंधारण केवळ याचा पहिला भाग ठरतो. सोबतच अधिक महत्त्व आहे ते मृदसंधारण अर्थात माती टिकवून ठेवणं देखील तितकच महत्त्वाचं ठरतं. ज्यावेळी पावसाचे प्रमाण अधिक असतं, त्यावेळी सुपीक जमीन पाण्यासोबत वाहून जाते. अनेकदा अतिवृष्टीने पाण्यासोबत जमीन खरडून जाते. परिणामस्वरूप जमिनीचा पोत कमी होऊन उत्पादकता कमी होण्यास सुरुवात होते. जल आणि मृदसंधारण एकत्रित विचार केल्यास आपणास डोंगर माथा ते जमीन असा पाणलोट विस्तार करण्यासोबत शेततळे, पाण्याचे भूगर्भात फेरभरण व्हावे यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग आदी पर्याय आहे.

भविष्यात आपल्या येणाऱ्या पिढीला उत्तम पर्यावरण आणि पाणीपुरवठा सुरळीत राखायचा असेल तर आजच्या पिढीची मोठी जबाबदारी हा महत्त्वाचा संदेश घराघरात आणि मनामनात पोहोचला तरच याबाबतीत सकारात्मक काम होईल आणि तसे सकारात्मक परिणाम, बदल आगामी काळात आपणास दिसतील. मी समाजाचा एक घटक आहे आणि ही माझी जबाबदारी आहे, असे म्हणत प्रत्येक नागरिक यात सहभागी झाला तरच आगामी काळात चांगली स्थिती पुन्हा निर्माण होऊ शकते. कधी काळी पाण्याचे दुर्भिक्ष्य असणाऱ्या मध्य प्रदेशातील देवास मधील रेनवॉटर हार्वेस्टिंगने जलसंधारणाचा वस्तुपाठ घालून दिलेला आहे तर दुसऱ्या बाजूला लातूर जिल्ह्यात इतर जिल्ह्यातून पाणी आणून पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्याची दुर्दैवी वेळ आपण अनुभवलेली आहे. वंदे मातरम या राष्ट्रीय गीताचे हे १५० वे वर्ष आहे. यातील प्रथम ओळींमध्ये सुजलाम, सुफलामः! शब्दांचा वापर याच अर्थाने आहे. त्यामुळे आताच कामाला लागूयाः पडणारा प्रत्येक थेंब जिरावला तर भारत पुन्हा सुजलाम व्हायला वेळ लागणार नाही.

**– प्रशांत दैठणकर**

# भगवान पार्श्वनाथाचा अभिषेकाने वार्षिक यात्रेची सांगता; मोक्ष कल्याणक दिवस वेरूळ येथे साजरा

## हजारो भाविकांनी घेतले भगवान पार्श्वनाथचे दर्शन



छत्रपती संभाजीनगर, दि. २० (प्रतिनिधी) – छत्रपती संभाजीनगर जैन धर्मीयांचे २३ वे तीर्थंकर भगवान पार्श्वनाथ यांचा मोक्ष कल्याणक दिवस आज श्रावण सप्तमी निमित्त वेरूळ पहाड मंदिर वर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी गुरुकुल मधून विद्यार्थ्यांची भव्य शोभायात्रेचा समारोप पहाड मंदिर वर करण्यात आला यावेळी पार्श्वनाथ भगवंताच्या अभिषेक व पूजनाच्या बोलीचा कार्यक्रम संपन्न करण्यात आला यामध्ये सौधम इंद्र जलाभिषेक घृतभिषेक आरती शांतीधारा ध्वजारोहण इत्यादीच्या कार्यक्रम संपन्न करण्यात आला यात जितेंद्र पाटणी यांनी इंद्र पदाचा मान प्राप्त केला तर जलाभिषेक पंकज कुमार निरंजन कवडे यांना तर चतुर्थ कलश अभिषेक वृषभ बांदे, अभिषेक बांदे कुणाल पहाडे तुषार कासलीवाल पुष्कर वाकळे वर्धमान पांडे यांना प्राप्त झाला. घृतअभिषेक महेंद्र



चंद्रशेखर ठोले यांना तर पूर्ण कलश अभिषेक मिताली सुकुमार नवले यांच्या हस्ते केला. शांती धारा महेंद्र कुमार सुमित कुमार ठोले यांचे हस्ते करण्यात आली. अर्चना फल व तीर्थ रक्षा कळसाचा सन्मान पूनम सुकुमार नवले व गुलाबचंद बोराळकर यांना मिळाला. मंगल आरती अनघा संकेत मिश्रिकोटकर यांच्या द्वारे करण्यात आली. ध्वजारोहण संस्थेचे महामंत्री प्रेम चंद पाटनी यांच्या हस्ते करण्यात आले. पार्श्वनाथ भगवंतांना निर्वाण लाडू चढवण्याचा सन्मान प्रशांत कुमार काला परिवाराला प्राप्त झाला यावेळी सर्वोषधी व पुष्प माला यांचा सन्मान लावण्या चेतन पाटणी व सुनील शहा व सुमनबाई बबनलाल ललीत पाटणी यांच्या परिवाराला प्राप्त झाला. छत्रपती संभाजीनगर येथील देवेंद्र कुमार सोनी यांच्या स्मरणार्थ रोहित सोनी परिवारातर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले तर जलपान आयोजन धीरज धरम चंद पाटणी यांच्यातर्फे करण्यात आले या कार्यक्रमासाठी लासुर वेरूळ चापानेर कन्नड कसाबखेडा संभाजीनगर इत्यादी ठिकाणावरून हजारो भाविकांनी भगवताचे दर्शन घेतले कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शन अध्यक्ष दिनेश गंगवाल महामंत्री प्रेमचंद पाटणी सुमित ठोले मदनलाल पांडे गौतम ठोले निर्मल ठोले यांचे प्राप्त झाले. अशी माहिती अतुल बांदे सुहास मिश्रीकोटकर नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यांनी दिली.

# युनिसेफचा उपक्रम: राष्ट्रीय राजदूत अभिनेता आयुष्मान खुराणा यांची जालना जिल्ह्यातील चांदाई टेपली शाळेला भेट

छत्रपती संभाजीनगर, दि. २० (प्रतिनिधी) – आपल्या सभोवताली असलेल्या कोणत्याही बालकाचे बालपण जपणे ही समाजाची सामुहिक जबाबदारी आहे. त्यासाठी समाजाने योगदान द्यावे. जालना जिल्ह्यात युनिसेफच्या उपक्रमाचा भाग म्हणून स्थलांतरीत मजूरांच्या मुलांची जबाबदारी गावकरी, नातेवाईकांनी घेतली आहे,हे खरोखर वाखाणण्यासारखे आहे, असे गौरवोद्गार सुप्रसिद्ध अभिनेते आणि युनिसेफचे राष्ट्रीय राजदूत आयुष्मान खुराणा यांनी काढले.

प्रसिद्ध अभिनेते आणि युनिसेफ इंडियाचे राष्ट्रीय राजदूत आयुष्मान खुराना यांनी जालना जिल्ह्यातील चांदाई टेपली या गावी स्थानिक शाळेस बुधवारी (दि.१९) भेट दिली. येथे शिकणाऱ्या मुलांशी, त्यांच्या नातेवाईक, ग्रामस्थ व युनिसेफच्या बालमित्रांशी संवाद साधला. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथे त्यांच्याशी वार्तालाप झाला. त्यावेळी त्यांनी आपले मत व्यक्त केले. युनिसेफ इंडिया पथकाचे उपप्रतिनिधी यास्पर मोलर, जास्मिन चौधरी, सरपंच शंकर आसाराम आदी उपस्थित होते.

**जालना जिल्ह्यातील उपक्रम** – युनिसेफच्या माध्यमातून २०१४ पासून जालना जिल्ह्यात २५८ गावांमध्ये हा उपक्रम राबविला जातोय. रोजगारासाठी स्थलांतर कराव्या लागणाऱ्या पालकांच्या मुलांना स्थलांतर करावे लागू नये.



स्थलांतरामुळे त्यांचे आरोग्य, शिक्षण आणि एकूणच बालमनावर विपरित परिणाम होऊ नये म्हणून युनिसेफने हा उपक्रम राबविला आहे.

या उपक्रमात युनिसेफच्या पुढाकारातून स्थलांतरीत पालकांची मुले ही नातेवाईक, आजी आजोबा आणि गावातील विश्वासू नातेवाईकांच्या देखरेखीखाली कुटुंब आधारीत पर्यायी व्यवस्थेत सांभाळली जातात. त्यामुळे ह्या मुलांचे शिक्षणातील गळतीचे प्रमाण थांबवण्यात यश आले आहे. त्यांचे आरोग्य चांगले राखण्यातही यश आले आहे. या कामात युनिसेफ मार्फत प्रशिक्षित स्वयंसेवक अर्थात बालमित्र गावात राहून मदत करतात. मुलांच्या खेळ, अभ्यास, आहार, मानसिक आरोग्याची काळजी घेतात. त्यांना विविध उपक्रमांत सहभागी करुन घेतात.

**५८०० मुलांचे स्थलांतर थांबविण्यात यश**

युनिसेफच्या उपक्रमामुळे जालना जिल्ह्यात स्थलांतरानंतर कुटुंब-आधारित पर्यायी व्यवस्थेत राहणाऱ्या मुलांचे प्रमाण सातत्याने वाढून ६०.२३ टक्क्यांवर पोहोचले आहे. २०२६ मध्ये, जालना जिल्ह्यात सहा तालुक्यांमध्ये ६४९ युवा स्वयंसेवक कार्यरत आहेत. जिल्हाधिकारी आणि महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या राज्य स्थलांतर समितीच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम आणखी १९८ गावांमध्ये विस्तारित करण्यात आला आहे. २०२४-२५ मध्ये, पालक हंगामी कामासाठी स्थलांतरित झाल्यावर ५,८०० हून अधिक मुले आजी-आजोबा किंवा नातेवाईकांकडे राहिली. आजी-आजोबा, इतर नातेवाईक तसेच गावातील विश्वासू रहिवाशांनी सामुदायिकरित्या त्यांची काळजी घेतली. या सहभागामुळे शालेय अनुपस्थिती आणि गळती कमी होण्यास, पोषण व आरोग्य सेवांचा अखंड लाभ मिळण्यास, अधिक सुरक्षित मानसिक-सामाजिक वातावरण निर्माण होण्यास, तसेच बालमजुरी, बालविवाह आणि



किशोरवयीन गर्भधारणा रोखण्यास मदत झाली आहे.

श्री. खुराणा म्हणाले की, हंगामी, आर्थिक अडचणींमुळे होणारे स्थलांतर हा स्वखुशीने निवडलेला पर्याय नसून अनेक कुटुंबांसाठी ते कठोर वास्तव आहे.कोणत्याही मुलाला त्याच्या आवाक्यात नसलेल्या परिस्थितीमुळे आपले बालपण गमवावे लागू नये. युनिसेफचा कार्यक्रम केवळ सुरक्षित घर पुरवत नाही तर नातेसंबंधही जपतो, मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करतो आणि मुलांना उज्ज्वल भविष्याची आशा देतो.

श्री. खुराणा पुढे म्हणाले की, युनिसेफने प्रशिक्षित केलेले बालमित्र हे मुलांचे हक्क, सुरक्षितता,शिक्षणात मदत करतात. तसेच बालमजुरी आणि बालविवाह रोखण्यासाठी मदत करतात. त्यामुळे प्रत्येक मुलाला शिकण्याची आणि यशस्वी होण्याची संधी मिळते. भारतात मुलांच्या संरक्षणासाठी बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) सारखे मजबूत कायदे आहेत. बालकांसाठीचे हे संरक्षणात्मक उपाय हंगामी स्थलांतर करणाऱ्या कुटुंबांसह प्रत्येक मूल आणि इतर कुटुंबापर्यंत प्रत्यक्षात पोहोचतील यासाठी साऱ्यांनी आपले योगदान देणे आवश्यक आहे.

गावपातळीवर हा कार्यक्रम मुलांना कसा आधार देतो हे जाणून घेण्यासाठी खुराना यांनी किशोरवयीन मुली, मुले आणि काही कुटुंबांची भेट घेतली. ते पुढे म्हणाले की, प्रत्येक मुलाला सुरक्षित, प्रेमळ आणि पोषक कौटुंबिक वातावरणात वाढण्याचा हक्क आहे. सरकार मुलांच्या संरक्षणासाठी कायदे आणि योजना तयार करते. त्याचवेळी युनिसेफ, महाराष्ट्र सरकार, जिल्हा प्रशासन आणि गावातील रहिवासी एकत्र येऊन प्रत्येक मूल सुरक्षित राहील यासाठी काळजी घेतायेत हे पाहून मला त्यांचा अभिमान वाटतो.

युनिसेफ इंडियाचे यास्पर मोलर म्हणाले की, सर्वाधिक असुरक्षित मुलांना सुरक्षित आणि पोषक वातावरण पुरवण्यात जालना जिल्हा प्रशासनाला साथ देताना युनिसेफला आनंद होत आहे. या सहभागामुळे मुलांवरील हिंसाचार रोखला जाऊ शकतो. मुलांच्या आयुष्यात असलेले धोके वेळीच ओळखणे आणि कुटुंबांना आवश्यक सेवा देणे गरजेचे आहे. तसेच मुलांना सामाजिक संरक्षणाशी जोडण्यासाठी व्यवस्था अधिक बळकट करणेही महत्त्वाचे आहे. या कामासाठी सहकार्य देणाऱ्या आणि प्रत्येक मुलाच्या सुरक्षितता व काळजी या हक्कांसाठी पुढाकार घेणाऱ्या आयुष्मान खुराना यांचेही युनिसेफ मनःपूर्वक कौतुक करते.

खुराना आणि मोलर यांनी जालना जिल्हाधिकाऱ्यांचीही भेट घेतली आणि मुले व कुटुंबांवर या कार्यक्रमाचा होणारा परिणाम याबद्दल कौतुक केले.

# जिल्हाधिकारी कार्यालयात सद्भावना प्रतिज्ञा



छत्रपती संभाजीनगर, दि. २० (प्रतिनिधी) – माजी पंतप्रधान जीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त आज सद्भावना दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात सद्भावना प्रतिज्ञा घेण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सद्भावना प्रतिज्ञा दिली. जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा यांचा भेद न करता सर्व भारतीयांचे भावनिक ऐक्य आणि सामंजस्यासाठी कार्य करण्याची तसेच संवाद व संविधानिक मार्गाने मतभेद सोडविण्याची प्रतिज्ञा यावेळी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतली. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# क्रिप्टोला मिळणार विम्याचं कवच! चोरीपासून टोकन डिफॉल्टपर्यंत सुरक्षा!

InfinityDAO Crypto Insurance: जागतिक डिजिटल ॲसेट बाजारात जोखीम व्यवस्थापन आणि युजर्सच्या सुरक्षिततेला नवे परिमाण देणारे एक मोठे पाऊल उचलले गेले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर (AI) आधारित डिसेंट्रलाइज्ड-फायनान्स इकोसिस्टम असलेल्या InfinityDAO ने आपल्या IDL टोकन इकोसिस्टमसाठी तब्बल १ अब्ज अमेरिकन डॉलर मूल्याचा संस्थात्मक स्तरावरील विमा संरक्षण कार्यक्रम तयार करण्याच्या दिशेने वेगाने पावले टाकली आहेत.

मुंबई आणि लंडन येथून १८ ऑगस्ट २०२६ रोजी जाहीर करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत, युकेस्थित तज्ज्ञ क्रिप्टो इन्शुरन्स सिंडिकेटद्वारे हा संपूर्ण विमा आराखडा तयार केला जात आहे. अंडररायटरची अंतिम मंजुरी, अटी आणि मर्यादांच्या अधीन राहून हा विमा InfinityDAO, तिचे भागधारक आणि पात्र घटकांना बहुस्तरीय सुरक्षा प्रदान करेल. हा १ अब्ज अमेरिकन डॉलरचा विमा कार्यक्रम मुख्यत्वे पाच महत्त्वाच्या क्षेत्रांचे रक्षण करण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे.

**पाच प्रमुख क्षेत्रांना मिळणार विम्याचे कवच** – टोकन डिफॉल्ट संरक्षण : पॉलिसीमध्ये नमूद केलेल्या डिफॉल्टच्या नेमक्या व्याख्येच्या अधीन राहून, IDL टोकनवर परिणाम करणाऱ्या निश्चित विमाकृत घटनांविरुद्ध संरक्षण.

**प्लॅटफॉर्म डिफॉल्ट संरक्षण :** मूळ InfinityDAO प्लॅटफॉर्म आणि इकोसिस्टीम वर परिणाम करणाऱ्या निश्चित अपयश किंवा विमाकृत डिफफॉल्ट घटनांसाठी कव्हरेज.

गुन्हे आणि डिजिटल ॲसेट चोरी संरक्षण: पॉलिसीअंतर्गत कव्हर केलेल्या ठिकाणी, निश्चित चोरी, गुन्हे, सायबरसंबंधित नुकसान तसंच अनधिकृत ॲसेट-हस्तांतरण घटनांविरुद्ध संरक्षण.

डायरेक्टर्स आणि ऑफिसर्स दायित्व संरक्षण: पॉलिसीतील शब्दरचनेच्या अधीन राहून, आर्थिक संकट किंवा दिवाळखोरीदरम्यान उद्भवू शकणाऱ्या परिस्थितींसह, पात्र संचालक आणि अधिकाऱ्यांविरुद्धच्या कव्हर्ड व्यवस्थापन-दायित्व दाव्यांविरुद्ध संरक्षण.

इकोसिस्टीम आणि भागधारक संरक्षण : अंतिम विमा कराराच्या कक्षेत, पात्र वापरकर्ते, भागधारक तसंच प्लॅटफॉर्मच्या मालकी/व्यवस्थापन रचनेसाठी संरक्षण अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेली विमा चौकट.

बहुतांश डिजिटल ॲसेट प्रकल्प कोणत्याही थर्ड-पार्टी विम्याशिवाय काम करत असताना, InfinityDAO ची ही US$1 billion ची विमा मर्यादा त्यांना संपूर्ण क्रिप्टो जगतात एक वेगळी ओळख मिळवून देईल

Polygon ब्लॉकचेन आणि ५ मुख्य प्रोटोकॉल मॉड्यूल्स

InfinityDAO आपले IDL युटिलिटी टोकन Polygon ब्लॉकचेन नेटवर्कवर चालवते. ही इकोसिस्टम AI-आधारित आर्थिक व्यवस्थापन प्रणालीवर काम करते, जी टोकनचे वाटप, तरलता (Liquidity), मूल्य रिसायकलिंग आणि दीर्घकालीन शाश्वतता नियंत्रित करते. यासाठी ५ परस्परसंबंधित प्रोटोकॉल मॉड्यूल्स एकत्र काम करतात.

क्रिप्टो बाजारात विश्वासार्हतेचा नवा अध्याय

पारंपरिक वित्तीय बाजारांच्या तुलनेत क्रिप्टो क्षेत्रात तंत्रज्ञान, ताबा आणि सायबर सुरक्षिततेच्या बाबतीत मोठे धोके असतात. तज्ज्ञ विमा कंपन्या आधीच चोरी, फसवणूक आणि सायबर गुन्ह्यांसाठी क्रिप्टो विमा प्रदान करतात. मात्र, हा विमा टोकनच्या किंमतीची, परताव्याची किंवा लिक्विडिटीची कोणतीही हमी देत नाही, तर केवळ विशिष्ट बाह्य आणि ऑपरेशनल धोके विमा कंपनीकडे वर्ग करतो.

InfinityDAO च्या अंतर्गत मूल्यांकनानुसार, हा १ अब्ज अमेरिक डॉलरचा विमा कार्यक्रम पूर्ण झाल्यास IDL हे जगातील समर्पित विमा संरक्षण असणाऱ्या मोजक्या क्रिप्टो टोकन्सच्या क्लबमध्ये समाविष्ट होईल आणि असा विमा असणारे जगातील १४ वे टोकन ठरू शकेल.

प्रकल्पाचे मुख्य तपशील (At a Glance)

नेटवर्क: Polygon
मुख्य टोकन: IDL
प्रोटोकॉल व्हर्जन: १.२
प्रोटोकॉल संदर्भ तारीख: १६ ऑगस्ट २०२६
प्रस्तावित विमा संरक्षण: १ अब्ज अमेरिकन डॉलरपर्यंत पारदर्शक ब्लॉकचेन पायाभूत सुविधा, सिस्टेमॅटिक लिक्विडिटी कंट्रोल आणि १ अब्ज अमेरिकन डॉलरचा स्वतंत्र विमा या त्रिसूत्रीमुळे InfinityDAO ने डिजिटल ॲसेट क्षेत्राला केवळ सट्टेबाजीकडून एका गंभीर, संस्थात्मक आणि विश्वासार्ह आर्थिक पायाभूत सुविधेकडे नेण्याचे मोठे पाऊल टाकले आहे.

# एअर इंडिया इमारतीवर झळकणार १०६ हुतात्म्यांची नावे, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे चिरंतन स्मरण

छत्रपती संभाजीनगर, दि. २० (प्रतिनिधी) – संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी बलिदान दिलेल्या १०६ हुतात्म्यांचे चिरंतन स्मरण व्हावे यासाठी राज्य सरकारने ताब्यात घेतलेल्या एअर इंडियाच्या नव्या प्रशासकीय इमारतीच्या दर्शनी भागात या सर्व हुतात्म्यांची नावे ठळकपणे आणि सन्मानपूर्वक लावली जाणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत मुख्य सचिवांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. ठशश्रळसळेप । इशश्रळशष

संयुक्त महाराष्ट्रासाठी बलिदान देणारया हुतात्म्यांची नावे या इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या दर्शनी भागात ठळक अक्षरांत कायमस्वरूपी कोरावीत, अशी मागणी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशीष शेलार यांनी केली होती. ’संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी झालेल्या ऐतिहासिक आंदोलनात १०६ आंदोलकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांच्या बलिदानामुळे महाराष्ट्राची निर्मिती झाली असून या हुतात्म्यांचे योगदान महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर आहे. त्यांच्या स्मृती चिरंतन राहायला हव्यात. त्यासाठी आवश्यक असल्यास सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून संबंधित विभागाला योग्य ते सहकार्य करण्यात येईल, असे शेलार यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात नमूद केले होते. फडणवीसांनी शेलार यांच्या मागणीची दखल घेत मुख्य सचिवांना याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक

लोकविजय

(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)

हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.

: संपादक :

राजेंद्र पांडुरंग रांजणीकर

मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५

e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.

(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# औद्योगिक वीज समस्यांवर उपाययोजनांची महावितरणकडून ग्वाही; संचालक धनंजय औंढेकर यांचा मसिआतर्फे सत्कार




छत्रपती संभाजीनगर दि.२० (प्रतिनिधी)- मराठवाड्याचे सुपुत्र तथा महावितरणचे संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांच्या नियुक्तीबद्दल मसिआतर्फे (मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर) वाळूज येथील 'अनिल विश्वासराव चव्हाण सभागृहात' भव्य सत्कार करण्यात आला. मसिआचे अध्यक्ष गजानन देशमुख यांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन औंढेकर यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी महावितरणचे मुख्य अभियंता दीपक कुमठेकर, मसिआचे उपाध्यक्ष राहुल मोगले व राजेंद्र चौधरी, सचिव विरेंद्र पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. देशमुख म्हणाले की, मराठवाड्याचे सुपुत्र म्हणून औंढेकर यांनी महावितरणच्या महत्त्वपूर्ण पदाची जबाबदारी स्वीकारणे ही संपूर्ण मराठवाड्यासाठी तसेच औद्योगिक क्षेत्रासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या कार्यकाळात मराठवाड्यातील उद्योगांच्या वीजविषयक प्रश्नांना सकारात्मक दिशा मिळेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमात वाळूज, शेंद्रा, चिकलठाणा व परिसरातील औद्योगिक क्षेत्रातील वीज पायाभूत सुविधा, दर्जेदार व अखंडित वीजपुरवठा, फीडर व सबस्टेशनची क्षमता, व्होल्टेजची गुणवत्ता, नवीन उद्योगांना वीज जोडणी तसेच भविष्यातील वाढत्या वीज मागणीचे नियोजन या विषयांवर चर्चा करण्यात आली. औद्योगिक विकासासाठी महावितरण आणि उद्योग क्षेत्रामध्ये सातत्यपूर्ण संवाद व समन्वय आवश्यक असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

यावेळी संचालक औंढेकर यांनी सत्काराबद्दल आभार व्यक्त करून उद्योगांच्या वीजविषयक प्रश्नांबाबत सकारात्मक दृष्टिकोनातून सहकार्य करण्याची भूमिका स्पष्ट केली. उद्योगांच्या वाढीसाठी आवश्यक वीज पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही त्यांनी दिली. वाढीव वीजभार अथवा नवीन वीज जोडणीसाठी उद्योजकांनी महावितरणशी संपर्क साधावा. सौर ग्राहकांसाठी ट्रान्सफॉर्मरसह बॅटरी स्टोरेजची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून साठविलेली वीज ग्राहकांना वापरणे सुलभ होईल. महावितरणच्या ट्रान्सफॉर्मरला बॅटरी फिटिंगची व्यवस्था करण्यात येणार असून त्यामुळे बॅकअप यंत्रणा कार्यान्वित राहण्यास मदत होईल व वीजपुरवठा खंडित झाल्यास उपकरणे बंद पडण्याची शक्यता कमी होईल. ग्रामीण व शहरी भागातील औद्योगिक सुविधांमध्ये असलेली तफावत कमी करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
ािशाषाता:
एमआयडीसीबाहेरील ग्रामीण भागातील उद्योजकांना सुविधा मिळण्यात होणारा विलंब कमी करण्यासाठी संबंधित भाग शहरी विभागाशी संलग्न करण्याचे निर्देश त्यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिले. ज्या औद्योगिक ग्राहकांना वीजपुरवठा आवश्यक आहे, त्यांनी ट्रान्सफॉर्मर व संबंधित पायाभूत सुविधा उभारण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून दिल्यास त्यांना वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यात येईल. वीजविषयक अडचणींसाठी उद्योजकांनी थेट आपल्याशी संपर्क साधावा, असे आवाहन औंढेकर यांनी केले.

मुख्य अभियंता कुमठेकर यांनी औद्योगिक क्षेत्राला दर्जेदार व विश्वासार्ह वीजपुरवठा देण्यासाठी महावितरण प्रशासन कटिबद्ध असल्याचे सांगितले. उद्योगांच्या वीजविषयक अनेक समस्या मागील काळात कमी झाल्या असून उर्वरित समस्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमास अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, जी. टी. सपकाळे यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते. तसेच मसिआचे माजी अध्यक्ष सुनील भोसले, किरण जगताप, सहसचिव प्रल्हाद गायकवाड, मिलिंद कुलकर्णी, कोषाध्यक्ष नितीन तोष्णीवाल यांच्यासह कार्यकारिणी सदस्य व बहुसंख्य उद्योजक उपस्थित होते.

## अखिल महाराष्ट्र राज्य रेडिओ श्रोता संमेलन छत्रपती संभाजीनगर-२०२६-उत्साहात संपन्न



वैजापूर/छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- 'बहुजन हिताय-बहुजन सुखाय ' 'श्रोता संतुष्ट तर आकाशवाणी संतुष्ट'रेडीओ -आकाशवाणी कार्यक्रमात श्रोता सहभाग जास्तीचा असावा, देशातील रेडीओ -आकाशवाणी चे कार्यक्रम श्रोत्यांच्या सहभागावर अवलंबून असतात.आकाशवाणी कार्यक्रम श्रोत्यांच्या सहभागामुळे चालतात ,यास्तव श्रोत्यांच्या आवडी -निवडी विचारात घेऊन ,आकाशवाणी कार्यक्रमांचे नियोजन असावे असा सूर 'अखिल महाराष्ट्र राज्य रेडिओ श्रोता संमेलन छत्रपती संभाजीनगर-२०२६ च्या 'रेडिओ दिन',निमित्त आयोजित कार्यक्रमात गुरुवार(ता,२०)रोजी राज्यांच्या विविध भागातून आलेल्या आकाशवाणी श्रोत्यांनी काढला. संभाजीनगर येथील साखरे मंगल कार्यालयांत रेडिओ दिन-२०ऑगस्ट ,निमित्त हे संमेलन उत्साहात पार पडले.या संमेलनाचे उदघाटन आकाशवाणी केंद्र छत्रपती संभाजीनगर चे केंद्र निर्देशक सुमित बनसोडे,वृत्तपत्र निवेदक समरजितसिंग ठाकूर,वैजापूरचे जेष्ठ श्रोते व शिर्डीच्या साईबाबांची भूमिका हुबेहूब वठवणारे ठा.धोंडीरामसिंह राजपूत,तसेच संमेलन अध्यक्षा

अंजली खंडाळीकर,उपाध्यक्ष सुरेश जाधव,सचिव प्रकाश बोरगावकर,सल्लागार अशोक पाटील यांनी प्रथम हिंदवी स्वराज्य संस्थापक व महाराष्ट्रचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व द्वीप प्रज्वलित करून उदघाटन केले. समरजितसिंग ठाकूर यांनी मनोगत व्यक्त केले.श्रोत्यांनी आकाशवाणी कार्यक्रम कसे असावे?, श्रोत्यांना काय हवे?तसेच कार्यक्रमात कोणत्या सुधारणा हव्यात ?या विषयी आपले मत व्यक्त केले.आकाशवानी केंद्र निर्देशक बनसोडे यांनी श्रोत्यांच्या योग्य सूचनांची दखल घेत येत्या काही दिवसात कार्यक्रमात योग्य बदल करून काही नवे कार्यक्रम आरंभ करण्याचे आश्वासन दिले.पुढील वर्षी छत्रपती संभाजीनगर आकाशवाणी केंद्र स्थापनेचे सुवर्ण महोत्सव वर्ष असणार आहे, त्यानिमित्त श्रोत्यांनाही या निमित्त कार्यक्रमात निमंत्रण देण्यात येईल असे केंद्र निर्देशक यांनी विशद केले.

पुढील वर्षी अखिल महाराष्ट्र राज्य श्रोता संमेलन राज्यातील सोलापूर येथे होणार असल्याची घोषणा अंजली खंडाळीकर यांनी केली. खंडाळीकर व अन्नदाते यानी सूत्र संचलन केले तर सुरेश जाधव यांनी आभार मानले.या समयी आप्पासाहेब जाधव,संदीप देवकर,मारोती भोसले, डॉ.नामदेव भुतेकर,पांडुरंग साळवे, मारोतराव पांचाळ, धनंजय वाघ,संतोषकुमार नागणे,व महाराष्ट्र राज्याच्या काना कोपऱ्यातून असंख्य श्रोते या संमेलनात उपस्थित होते.तसेच महाराष्ट्र राज्याच्या बीड,सोलापूर, अकोला, परभणी, आकाशवाणी केंद्रांचे निवेदक ही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मृद व जलसंवर्धन रील्स स्पर्धेला ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

### क्षेत्रीय स्तरावरील उत्स्फूर्त प्रतिसादाची दखल; मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांची माहिती

मुंबइ दि.२० (प्रतिनिधी)- माजी मुख्यमंत्री स्वर्गीय सुधाकरराव नाईक यांच्या कार्याला अभिवादन म्हणून २१ ऑगस्ट रोजी राज्यभर 'जल संधारण दिन' साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त मृद व जल संधारणाबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या 'महा वॉकेथॉन–वॉक फॉर वॉटर' आणि 'मृद व जल संवर्धन रील्स स्पर्धे'ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या प्रतिसादाची दखल घेत मृद व जलसंवर्धन रील्स स्पर्धेसाठी रील्स अपलोड करण्याची मुदत आता ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिली.

मृद व जलसंवर्धनाबाबत नागरिक, विद्यार्थी आणि युवकांमध्ये जनजागृती व्हावी, तसेच या विषयाशी संबंधित नाविन्यपूर्ण उपक्रमांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने रील्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी यापूर्वी १९ ऑगस्ट २०२६ पर्यंत रील्स अपलोड करण्याची मुदत निश्चित करण्यात आली होती.

मात्र, क्षेत्रीय स्तरावर या स्पर्धेला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि रील्स तयार करून अपलोड करण्यासाठी उपलब्ध झालेला कमी कालावधी लक्षात घेऊन स्पर्धेला मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात आली होती. या मागणीची दखल घेत रील्स अपलोड करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्याचा शासन निर्णय घेण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

मृद व जलसंधारण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून, त्यामध्ये समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग आवश्यक आहे. 'माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा' या संदेशातून नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावे आणि आपल्या सर्जनशीलतेच्या माध्यमातून मृद व जलसंधारणाचा संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन मंत्री संजय राठोड यांनी केले.

दरम्यान, २१ ऑगस्ट रोजी राज्यभर आयोजित करण्यात येणाऱ्या 'महा वॉकेथॉन–वॉक फॉर वॉटर'मध्येही नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन जल संधारणाच्या लोकचळवळीला बळ द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ग्राहक बनून आल्या, दीड किलो सोनं चोरुन गेल्या!

छत्रपती संभाजीनगर दि.२० (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगरमध्ये सोन्याच्या दुकानात अशीच एक धाडसी चोरी झाली आहे. ग्राहक बनून आलेल्या महिलांनी तब्बल दीड किलो सोन्याची चोरी केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये हादरवणारी चोरीची घटना घडली आहे. छत्रपती संभाजी नगरमध्ये ग्राहक बनून आलेल्या महिलांकडून तब्बल दीड किलो सोन्याची चोरी करण्यात आल्याची घटना घडली आहे. छत्रपती संभाजी नगरच्या शहागंज परिसरातील विश्वास ज्वेलर्स मध्ये ही चोरीची घटना घडली आहे. दोन पुरुष आणि चार महिलांनी मिळून दीड किलो सोन्याचा डब्बा लांबवल्याचे समोर आले आहे. एका मागून एक ग्राहक बनून आले, रेकी केली आणि तब्बल दीड किलो सोने घेऊन पसार झाल्याचे समोर आले आहे. दोन पुरुष तर चार बुरखाधारी महिलांनी ही चोरी केल्याचे उघड झाले आहे.

## भारतीय जैन संघटना, लायन्स क्लब चिकलठाना आणि जैन सोशल ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने गुरु आनंद प्रभा जन्मोत्सव निमित्त रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर

छत्रपती संभाजीनगर दि.२० (प्रतिनिधी)- आचार्य सम्राट आनंद ऋषिजी महाराज साहेब आणि गुरुनीषा प्रभाकर जी महाराज साहेब यांच्या जन्म जयंतीच्या पावन प्रसंगी भारतीय जैन संघटना, लायन्स क्लब आणि जैन सोशल ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिर व आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले.

सेवा ही साधना रक्तदान, महादान. ५० हून अधिक युनिट रक्तदान करण्यात आले तसेच ५० हून अधिक लोकांनी आरोग्य तपासणी व चेकअप करून घेतले.

कार्यक्रमाचे आयोजन श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ, महावीर भवन, कुंभारवाडा, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले. शिबिरात मोठ्या संख्येने समाजबांधवांनी सहभाग घेऊन रक्तदान केले तसेच विविध आरोग्य तपासणी सुविधांचा लाभ घेतला. शिबिरात ब्लड प्रेशर, ब्लड शुगर, हिमोग्लोबिन, बीएमआय व सामान्य आरोग्य सल्ला अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

कार्यक्रमाला जिनशासन प्रभाविका श्री चैतन्यश्री जी म.सा. आदि ठाणा ४ यांचे सान्निध्य लाभले.

या प्रसंगी मीठालालजी कांकरिया, झुंबरलालजी पगारिया, पंकज फुलफगर, ॲडव्होकेट गौतम संचेती, तनसुख झांसा, अनिल संचेती, किशोर ललवानी ,पारस चोरडिया ,दिलीप मुगदिया, राजेंद्र पगारिया, गजानन झलवार, भारती बागरेचा, विमला रानी बाफना, मनीषा भंसाली, रवि लोढा, रोहित छाजेड़ ,हितेश कांकरिया, प्रकाश कोचेटा, पराग बागरेचा ,मनोज पगारिया,संजय लोढ़ा ,अविनाश डोडल, योगेश रूनवाल अनेक मान्यवर अतिथी व समाजबांधव उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या आयोजनात दर्शना लुणावत, कल्याणी शुक्ला, शीतल पगारिया, कल्पना रूनवाल, वनिता छाजेड़, वीणा गादिया, राखी फुलफगर आणि नीता सेठिया यांसह आयोजक समितीच्या सदस्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

Old Name - Shaikh Faizan Shaikh Faookh
New Name - Shaikh Faizan Shaikh Farokh
Address - Plot No 13 Sudhakar Naagar M square Aurangabad

(पान १ वरुन)

## २८ तारखेपर्यंत ठोस निर्णय घ्या;...

यांनी सरकारवर जोरदार टीका केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने कुणबी प्रमाणपत्रे देण्याची प्रक्रिया सुरू केली; मात्र आता काही प्रमाणपत्रे रद्द करण्याची कारवाई सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. गोरगरीब समाजाच्या परिस्थितीची जाणीव सरकारला असायला हवी होती. प्रमाणपत्रे रद्द करण्याची कारवाई सुरू केल्यास त्याचे परिणाम सरकारला भोगावे लागतील, असा इशारा त्यांनी दिला. 'सरकारला २८ ऑगस्टपर्यंत ठोस निर्णय घेण्याची संधी आहे. या मुदतीत निर्णय झाला नाही, तर २९ ऑगस्टचे आंदोलन निश्चित आहे. त्यानंतरचे आंदोलन सरकारला झेपणार नाही,' असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला.

## गुजरातमध्ये बनावट दारूचे ६ बळी,..

जणांनी बनावट दारूचं सेवन केलं होतं. दरम्यान, विश्वराजसिंह यांची प्रकृती सध्या गंभीर असून ते भावनगरमधील एका हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहेत. या घटनेत बाधित झालेले लोक भावनगर जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागांमधील आहेत. ही दारू एकाच अवैध दारू विक्रेत्यांच्या साखळीच्या मार्फत मिळाली असावी असा संशय पोलिसांना आहे. या घटनेत बाधित झालेल्या अनेक रुग्णांना श्वास घेण्यास त्रास होत आहे. तसेच काहींना दृष्टी जाणं या सारखी लक्षणे जाणवत आहेत. तसेच मूत्रपिंडाशी संबंधित देखील त्रास जाणवत असल्याची माहिती सांगितली जात आहे.

## लुटारूंनी जहाजावरून लुटला...

करण्यात आले होते. मात्र याबाबत अधिक संवेदनशील माहिती सार्वजनिकरीत्या जाहीर करण्याची परवानगी देण्यात आलेली नाही.

तसेच या अपहरणाच्या घटनेबाबत तुर्कीच्या अधिकाऱ्यांनी कुठलीही प्रतिक्रिया दिलेली नाही. सुमारे आठ समुद्री चाच्यांनी हे अपहरणनाट्य घडवून आणलं. ज्या जहाजाचं अपहरण झालं त्याची सध्याची स्थिती काय आहे. या जहाजावरील क्रू मेंबरची सद्यस्थिती काय आहे. याबाबत अद्याप काही माहिती मिळू शकलेलं नाही.

## दोन्ही शिवसेनेच्या वादात फायदा...

दोन्ही शिवसेनेकडे असलेले आमदार, खासदार हे त्यांच्याकडे टिकतील का? हा मोठा प्रश्न असल्याचे ॲड. आंबेडकर म्हणाले.

दोन्ही शिवसेनेतील वादाचा फायदा अमित शाह, भाजप घेईल. 'धनुष्यबाण' हे चिन्ह न्यायालयाकडून गोठवल्यानंतर हे आमदार, खासदार भाजपाकडे पळतील. न्यायालयाने निर्णय कोणाच्याही बाजूने लागला तरी फायदा भाजपचा आहे, असा दावा ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केला.

मध्यंतरी भाजपाने पक्ष फोडाफोडी सुरू केली होती. मात्र, पेपरफुटी प्रकरण, तरुणाईमधील तीव्र नाराजीमुळे जंतरमंतरवरील आंदोलन भडकले. याचा मोठा फटका सत्ताधारी भाजपाला बसला आहे. या आंदोलनामुळे भाजपाच्या फोडाफोडीच्या प्रकाराला आळा बसला होता. न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर आमदार, खासदारांची फोडाफोडी मोठ्या प्रमाणात दिसेल, असे ॲड. आंबेडकर यांनी सांगितले. यावेळी वंचित आघाडीचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

## सरकारने तातडीने सुप्रीम कोर्टात...

मागणीही हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. यावेळी त्यांनी सरकारवर टीका करत हल्लाबोल केला. ते पुण्यात बोलत होते.

ज्यांना कोर्टाने गुन्हेगार ठरवलं, त्यामुळे ते आरोपी नाहीत. आज रोजी त्यांना जामीन देखील मिळत आहेत. जमानत मिळवणारे हे आरोपी नाही, तर त्यांच्यावर गुन्हा सिद्ध झालेला आहे आणि अशांना जामीन मिळणं म्हणजे आपली न्यायव्यवस्थेवरच हा एक थेट स्वरूपाचे असणारं प्रश्नार्थक चिन्ह आहे. त्याचा सोबतच जर सरकार समाजसेवेला, समाजसुधारणेला आणि हा समाज समता, बंधुता, सामाजिक न्यायाच्या अंगाणे पुढे गेला पाहिजे, असा विचार देणाऱ्या व्यक्तींच्या खूण्यांना जर मदत करत असेल, तर हा राष्ट्र म्हणून अपमान आहे. नागरिक म्हणून अपमान आहे. असे देखील हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

## नरेंद्र मोदींचा पंतप्रधान म्हणून...

राहुल गांधींचं माझं एकमत आहे या विषयावर, मला माहिती आहे ना, गेले काही महिने मी हेच सांगतोय की, हे महाशय जे आहेत प्रधानमंत्री सध्या, ते त्यांची टर्म पूर्ण करत नाहीयेत. त्यांना अत्यंत वाईट परिस्थितीत हे पद सोडावे लागत आहे, तुम्हाला १७ सप्टेंबर नंतर या गोष्टीचा उलगाडा होईल, असंही पुढे संजय राऊत यांनी म्हटलं आहे. १७ सप्टेंबर त्यांचा वाढदिवस आहे, काय आहे, खूप अभ्यास करून इथे उभं रहावं लागत आम्हाला, १७ सप्टेंबर नंतर असं काय होईल ते कळेल, १७ सप्टेंबरला त्यांचा वाढदिवस आहे, त्यांचा प्रधानमंत्री म्हणून तो शेवटचा वाढदिवस असेल, तो त्यांनी आंनदांत साजरा करावा, त्यांच्या भक्तांनी नाचावं, अंधभक्ताने उड्या माराव्यात, गाणं बिनं गावं, पार्ट्या कराव्यात रात्री, नंतर पुढल्या प्रसंगाला त्यांनी सामोर जावं, अमित शाह कधीच प्रधानमंत्री होणार नाहीत, मोदी गये तो अमित शाह भी गये, हैं क्या, एकावर एक फ्री आहेत ना ते, असंही संजय राऊतांनी म्हटलं आहे.

महसुल विभाग

**जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर**

**(शाखा भूसंपादन, छत्रपती संभाजीनगर)**

कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक- ई-मेल dycollectorslao@gmail.com

सत्यमेव जयते

जा.क्र.२०२६/उपजिभूर्स/कावि दिनांक:- /०७/२०२६

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३**

**अधिसूचना- कलम १९**

ज्याअर्थी, ओ आर क्र. ९/२०२३ समुचित शासन असलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांचे मार्फत उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, छत्रपती संभाजीनगर यांनी भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त व अधिनियम छ असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन अधिसूचना, **शासन राजपत्र गुरुवार ते बुधवार जुलै १७-२३, २०२५ पान क्रमांक १९४७ आषाढ / श्रावण २६-१ पान क्रमांक १८३५ दैनिक स्वरगंगा दिनांक २७.०६.२०२५, दैनिक लोकपत्र यात दिनांक २७.०६.२०२५ अन्वये** प्रारंभिक अधिसूचना काढली आहे. त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि, ज्याअर्थी, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे कलम १५ च्या पोट कलम (२) अन्वये कोणत्याही खातेदारांनी आक्षेप नोंदविलेला नाही. उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, छत्रपती संभाजीनगर यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**
**जमिनीचे वर्णन**
**गाव :- कृष्णापुरवाडी तालूका जिल्हाः छत्रपती संभाजीनगर**

| अ.क्र. | गट क्र. | एकुण संपादीत क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|
| १ | ४७/१ | ०.२२ | परिशिष्ट १६ प्रमाणे |
| | एकूण | ० हे २२ आर | |

**अनुसूची-दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नांव : **सांवगी ते चिकलठाणा ६० मी. रुंद रस्त्यासाठी मौजे कृष्णापुरवाडी ता.जि. छत्रपती संभाजीनगर.**
प्रकल्पाचे कामाचे वर्णन : **सांवगी ते चिकलठाणा ६० मी. रुंद रस्त्यासाठी मौजे कृष्णापुरवाडी ता.जि. छत्रपती संभाजीनगर**

**समाजाला होणारे लाभ :-**
अ) या प्रकल्पव्दारे जमिनीस सिंचनाचा फायदा होणार आहे.
ब) या योजने अंतर्गत तालुक्यातील आवर्षणग्रस्त गावांना त्याचा लाभ होणार आहे.
क) या योजनेमुळे या गावाचे क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

**अनुसूची- तीन**
**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

मौजे कृष्णापुरवाडी तालुका जि. छत्रपती संभाजीनगर सांवगी ते चिकलठाणा ६० मी. रुंद रस्त्यासाठी मौजे कृष्णापुरवाडी ता. जि.छत्रपती संभाजीनगर येथील क्षेत्र ० हे २२ आर संपादित करावयाच्या सदर क्षेत्रामध्ये फक्त शेत जमिन येत असून, गावठाणे विस्थापित होत नाही. सबब विस्थापितांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

**अनुसूची- चार**
**(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करण्याच्या अधिकरणाने दिलेला)**
**(सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश)**
निरंक

**अनुसूची-पाच**
**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल**
अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-यांचे पदनाम :- लागू नाही.
ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :- निरंक
क) ज्या अधिसुचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे.:- निरंक
त्या अधिसूचनेचा तपशील
टीप :- उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात निरिक्षण करता येईल.

दिनांक :- / /२०२६
ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर

**स्वाक्षरीत/-**
**(विनय गौडा जी सी) भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर**

जिमाका/छ.स.न/जाहि/१७०/२०२६-२०२७